महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक १६ जुलै, २०१५ / आषाढ २५, १९३७ (शके)

(१) महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री
(२) परिवहन मंत्री
(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ९१

राज्यातील मुस्लीम समाजाला शिक्षणामध्ये ५ टक्के आरक्षण देण्याबाबत

(१) * ७८८६ श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लीम समाजाला शिक्षणामध्ये ५ टक्के आरक्षण देण्याचे मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मा.उच्च न्यायालयाने मान्य केलेले आरक्षण दि.५ फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात शासनाने अध्यादेश काढून मुस्लीम समाजाचे आरक्षण रद्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने मान्य केलेले आरक्षण देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, अंशत: खरे आहे.

शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लीम समाजाला शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण विहीत केले होते. तथापि, मुस्लीम आरक्षणाविषयी दाखल झालेल्या याचिकांबाबत मा. उच्च न्यायालयाने दि. १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी अंतरिम आदेश पारित केले असून त्यायोगे मुस्लीम समाजाला शासनाने शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थामध्ये दिलेले ५ टक्के आरक्षण अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत सुरु ठेवण्यास अनुमती दिली होती. सद्य:स्थितीत अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्याने तो दि. २३ डिसेंबर, २०१४ रोजी व्यपगत झाला आहे.

(२) नाही.

सदर अध्यादेश व्यपगत झाल्यामुळे सद्य:स्थितीत मुस्लीम समाजात आरक्षण लागू नाही.

(३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा. उच्च न्यायालयाचा अंतीम निर्णय झाल्यावर तो विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला अदा करण्याबाबत

(२) * ६८०३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सूर्या प्रकल्पासाठी (जि.पालघर) शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांना जमिनीपैकी किती जमिनींचा अंतिम निवाडा घोषित होऊन किती शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्यात आला आहे,

(३) असल्यास, अद्याप शेतकऱ्यांना मोबदला न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व मोबदला लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे खरे आहे.

(२) कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र.१ शहापूर यांचे कार्यालयाकडून प्राप्त २२९ प्रस्तावांपैकी १५५ प्रस्तावांमध्ये जमिनीचा निवाडा घोषित करुन मोबदला वाटप करण्यात आलेला आहे. उर्वरित ७४ प्रस्ताव निधीच्या अनुपलब्धतेमुळे व्यपगत झाल्याने कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र. १ शहापूर यांचेकडे परत करण्यात आलेले आहेत.

(३) घोषित निवाड्यामधील काही प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत खातेदार मयत झाल्याने सदर खातेदारांच्या वारसाची नोंद न होणे, प्रकल्प धारकाकडून मोबदला घेणेकामी कागदपत्रांची पुर्तता न होणे, ७/१२ सदरी सामाईक खातेदारांमध्ये आपापसात वाद असणे, मोबदला स्विकारण्यासाठी नोटीसा देऊनही खातेदारांनी संपर्क न साधणे इ. बाबींमुळे मोबदला वाटप प्रलंबित आहे.

संबंधीत खातेदारांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांचेशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे सादर केल्यास मोबदला देण्याची तजबीज ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्याचे विभाजन करून मालेगांव जिल्हा करणेबाबत

(३) * ८१०५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८१५ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्याचे विभाजन करून मालेगांव जिल्हा निर्मिती करण्याच्या मागणीचे अनुषंगाने जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अप्राप्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत अहवालातील शिफारशींचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने नाशिक जिल्हा विभाजन तसेच मालेगांव जिल्हा निर्मितीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) जिल्हा विभाजन निकष ठरविण्यासाठी गठीत समितीचा अहवाल अद्यापी प्राप्त झालेला नसल्यास तो केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे,

(४) यासाठी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक दिनांक २६.०६.२०१५ रोजी झाली असून सदर बैठकीत समितीने काही मुद्यांबाबतची माहिती क्षेत्रिय यंत्रणेकडून मागविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर जिल्हा पुनर्रचना / विभाजनाबाबतचे निकष निश्चित करण्यात येऊन त्यासंदर्भातील अहवाल समितीद्वारे शासनास सादर करण्यात येईल. सदर अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारे नाशिक जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन मालेगाव जिल्हा निर्मितीबाबत यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

राज्यातील मोठया जिल्ह्याचे व तालुक्याचे विभाजन करून नवीन जिल्ह्यांची व तालुक्यांची निर्मिती करण्याबाबत

(४) * ८२८७ श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल तटकरे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठया जिल्ह्याचे व तालुक्याचे विभाजन करुन नविन जिल्ह्यांची व तालुक्यांची निर्मिती करण्याबाबत विचार करण्यासाठी प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या निर्मितीसाठी कोणकोणते निकष निश्चित करण्यात आले आहेत तसेच कोणकोणत्या जिल्ह्याचे/तालुक्याचे विभाजन करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) उक्त समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय, केव्हा,

(४) तसेच समितीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(५) समितीने अहवाल सादर केला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) राज्यात नवीन जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या निर्मितीसाठी निकष ठरविण्याच्या दृष्टीने अनुक्रमे प्रधान सचिव (महसूल) व विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली दोन स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.
(२), (३), (४) व (५) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच नवीन जिल्हा निर्मितीबाबत यथोचित निर्णय घेण्यात योजिले आहे.

तसेच, तालुका पुर्नरचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर सविस्तर अभिप्राय देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आलेले आहे. विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच राज्यातील तालुक्यांची पुनर्रचना करुन नवीन तालुक्यांच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

राज्यात माहे जानेवारी ते एप्रिल, २०१५ या कालावधीत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत देण्याबाबत

(५) * ६६६८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल तटकरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.जयवंतराव जाधव, श्री.आनंद ठाकूर, श्री.चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मराठवाड्यात, बीड, उस्मानाबाद, यवतमाळ व विदर्भात माहे जानेवारी, २०१५ ते एप्रिल, २०१५ या कालावधीत दुष्काळी परिस्थिती, गारपीट व अवकाळी पाऊस, सततची नापिकी, सावकार, सोसायट्या व बँकेचे कर्ज यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत तर दुसरीकडे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत देण्यासाठी होणाऱ्या चौकशीस विलंब होत असल्याची बाब माहे मे, २०१५ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जानेवारी, २०१५ ते एप्रिल, २०१५ या कालावधीत मराठवाडा व विदर्भामध्ये २६८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या त्यापैकी ७० प्रकरणी अद्यापही मदत देण्यात आली नाही, तर बीड जिल्ह्यात ९२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या त्यापैकी ४७ प्रकरणी अद्यापही मदत देण्यात आलेली नाही, चंद्रपूर जिल्ह्यात ४७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तसेच ता.देवगड (जि.सिंधुदूर्ग) हिंदळे-मोर्वे येथील आंबा बागायतदार पांडुरंग कोले यांनी हापूस बागायतीत झालेले नुकसान सहन न झाल्याने आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र आणि राज्य शासनाने कोट्यावधीचे पॅकेज देऊनही पात्र-अपात्र आणि चौकशीच्या प्रक्रियेमुळे शेतक-यांच्या आत्महत्यानंतर त्यांच्या कुटूंबियांना शासकीय मदतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या आत्महत्या केलेल्या सर्व शेतक-यांच्या कुटूंबियांना शासकीय आर्थिक मदत करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीची मदत करावयाची अट ५० टक्के वरून ३३ टक्केपर्यंत आणली आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करीत आहे,

(७) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) शेतकरी आत्महत्या प्रकरणी चौकशीस विलंब होत नसून निर्णयाअंती प्राप्त ठरलेल्या सर्व प्रकरणी संबंधीतांना मदत देण्यात येत आहे.

(२) प्रश्नाधिन विभाग/जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

विभाग/जिल्हा	एकूण	पात्र	अपात्र	चौकशी साठी प्रलंबित	मदत दिलेली
अमरावती	२४८	१६५	७५	०८	१६५
नागपूर	८४	६२	२०	०२	६२
औरंगाबाद	२१४	१६३	४३	०८	१६३
बीड	८०	५१	२४	०५	५१
चंद्रपूर	२१	१५	०४	०२	१५
एकूण	**६४७**	**४५६**	**१६६**	**२५**	**४५६**

पांडुरंग हरी कोले, रा.मोर्वेवाडी हिंदळे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग या शेतकऱ्याने दि.०३.०५.२०१५ रोजी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(३) नाही.

(४) शेतकरी आत्महत्या पात्र प्रकरणी मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रु. १.०० लक्ष मदत देण्यात येते.

(५) होय.

(६) राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व तद्नुषंगाने ठोस उपाययोजना करण्यासाठी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी सद्यस्थितीत यवतमाळ व उस्मानाबाद या ०२ जिल्ह्यांची निवड पथदर्शी प्रकल्प म्हणुन करण्यात आली आहे. तद्नुषंगाने आत्महत्याग्रस्त व आत्महत्याप्रवण क्षेत्रास विशेष मदत व सहाय्य करण्यासाठी सदर दोन जिल्ह्यातील प्रत्येक उप विभागाकरिता सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना ठिंबक व तुषार सिंचनाच्या
अनुदानाचे वितरण न झाल्याबाबत

(६) * ७८६० श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल तटकरे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्य शासनाला ठिंबक सिंचन योजनेसाठी ८० ते ८५ टक्के अनुदान देत असतांना केंद्र शासनाने ५० आणि राज्य शासनाने ५० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर, यवतमाळ व हिंगोली जिल्ह्याला केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांना ठिंबक सिंचनाचे अनुदान दिले. परंतु, जिल्हा नियोजन समितीच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचे ४ वर्षापासून अनुदान रखडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियांनांतर्गत ठिबक सिंचन संचासाठी शेतकऱ्यांना देण्यात येणारे २०१३-२०१४ वर्षाचे राज्यभरातील सुमारे साडेतीनशे कोटींचे अनुदान रखडले, व्हीआयडीपी अंतर्गत ठिंबक व तुषार सिंचन अनुदानाचे वाटप तसेच फळबाग योजनेचे अनुदान अद्यापी मिळाले नसल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पाणलोटाच्या अनेक योजना तेथील कृषी अधिकाऱ्यांनी संगनमतातून फस्त केल्याच्या असंख्य तक्रारी शासनाकडे वारंवार करुनही कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाने ठिबक व तुषार सिंचनासाठी केंद्र शासनाने पूर्वीप्रमाणे अनुदान द्यावे म्हणून पाठपुराव्या दाखल कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अंशत: खरे आहे.

सन २०१३-१४ पर्यत केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत व सन २०१४-१५ मध्ये शेतावरील पाणी व्यवस्थापन उप अभियानांतर्गत सुक्ष्म सिंचन योजनेसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ८०:२० असे होते. सन २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाने सुक्ष्म सिंचन योजना प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पिक (सुक्ष्म सिंचन) योजनेंतर्गत राबविण्याचे निश्चित करुन अनुदानाचे प्रमाण ५०:५० असेल असे कळविलेले आहे.
(२) सोलापूर जिल्हाचे सन २०१२-१३ पर्यतचे संपूर्ण प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. यवतमाळ जिह्याचे सन २०१३-१४ पर्यतचे संपूर्ण प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. यवतमाळ जिल्ह्यासाठी विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाअतंर्गत सुक्ष्म सिंचन योजना १००% केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत राबविण्यात येत असल्याने जिल्हा विकास निधीमधून पैसे उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. हिंगोली जिल्ह्यासाठी राज्य हिश्श्यापोटी आवश्यक असलेल्या सन २०१२-१३ व सन २०१४-१५ वे प्रस्तावांसाठी रु. १.५३ कोटी व सन २०१३-१४ साठी रु. २.४३ कोटी अशा एकूण रु ३.९६ कोटींची मागणी जिल्हा विकास निधीकडे करण्यात आली आहे.
(३) सन २०१३-१४ या वर्षासाठी राज्य शासनाने रु. ३३०.०० कोटी एवढया रकमेची तरतूद केली आहे. त्यापैकी रु. २३१.०० कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीचे वाटप शेतकऱ्यांना करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे. VIIDP अंतर्गत ठिबक व तुषार संचासाठी सन २०१३-१४ या वर्षात रु. ८५.६४ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१३-१४ मध्ये रु. १०१.५५ कोटी व सन २०१४-१५ मध्ये रु. ५२.३३ कोटी एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे.
(५), (६) व (७) सुक्ष्म सिंचन योजना ही केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण देशभर राबविण्यात येते. त्यामुळे या प्रकरणी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात खाजगी बसेसकडून प्रवाशांची होणारी लूट रोखण्याबाबत

(७) * ६८९७ श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विजय गिरकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईतून गोवा, कोकण, कोल्हापूर, सांगली, पुणे, सोलापूर येथे जाण्यासाठी सुट्टी व सणासुदीला खाजगी बसेसकडून दुप्पट तिकटीचे दर आकारुन प्रवाशांची लुट सुरू असल्याचे माहे मे-२०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी तिकीट दरांवर सरकारचे नियंत्रण नसल्याने हा प्रकार सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी बसेसकडून प्रवाशांची लुट रोखण्यासाठी शासनाने खासगी तिकीट दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी धोरण आखून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) व (२) हे खरे आहे.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहीत याचिकेमध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने खाजगी प्रवासी बसेसचे किमान व कमाल भाडे ठरवून त्याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मूर्तिजापूर (जि.आकोला) राष्ट्रीय मार्गावर असणाऱ्या बोरगांव मंजू या नविन तालुका निर्मितीचे निकष सुधारण्याबाबत

(८) * ७३८५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूर्तिजापुर (जि.अकोला) राष्ट्रीय मार्गावर असणाऱ्या बोरगांव मंजू हा नविन तालुका निर्मितीचे निकष सुधारित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) अहवाल प्राप्त झाला असल्यास अहवालाची छाननी पूर्ण करण्यात येऊन निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

श्री. एकनाथराव खडसे : (१), (२) व (३) राज्यात तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर सविस्तर अभिप्राय देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आलेले आहे. विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू तालुक्याच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

चंद्रपूर औष्णिक केंद्रातील वीज निर्मितीचे बंद पडलेले युनिट दुरूस्त करून कार्यान्वित करण्याबाबत

(९) * ६९२७ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर औष्णिक केंद्रातील ५०० मेगावॅट क्षमतेचे वीज निर्मितीचे एक युनिट सध्या बंद असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे महिन्यात वीजेची वाढती मागणी लक्षात घेता उपरोक्त युनिट दुरूस्त करुन तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय.

चंद्रपूर महाऔष्णिक केंद्रातील संच क्र.५ दिनांक ०१.०५.२०१५ ते दिनांक १०.०५.२०१५ पर्यंत बंद होता.

(२) सदर संचाची युद्धपातळीवर दुरूस्ती करुन दिनांक १०.०५.२०१५ रोजी सदर संच कार्यान्वित करण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात दारूबंदी धोरण राबविण्याबाबत

(१०) * ७०५५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात दारु बंदी लागू करण्यात आल्यानंतर राज्याच्या महसूलावर व सामाजिक प्रगतीवर काही परिणाम झाला आहे किंवा कसे याचा माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढावा घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,
(३) उक्त आढावा विचारात घेता संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच ठोस भूमिका घेतली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यात दि. १ एप्रिल, २०१५ पासून दारुबंदी लागू करण्यात आल्याने चंद्रपूर जिल्ह्याची माहे एप्रिल व मे, २०१४ ची देशी, विदेशी व बिअर मद्य विक्री विचारात घेता चालू वर्षी एप्रिल व मे, २०१५ मध्ये एकूण रु. ४१.९२ कोटी एवढे उत्पादन शुल्क शासनास मिळू शकले नाही.

तसेच एप्रिल, २०१४ ते जून, २०१४ व एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत नोंद झालेल्या गुन्ह्यांचे तुलनात्मक विश्लेषण केले असता एप्रिल ते ३० जून, २०१५ या कालावधीत भाग-१ ते ५ सदराखालील एकूण गुन्ह्यात तसेच रस्ते अपघाताच्या व कौटूंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यात घट झाल्याचे दिसून येते.
(३) व (४) संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण राबविण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

तथापि एखाद्या ग्रामपंचायतमध्ये किंवा नगरपालिका/महानगरपालिका मधील एखाद्या वार्डामध्ये दारुबंदी करावयाची असल्यास शासन अधिसूचना दि. २५.३.२००८ व दि. १२.०२.२००९ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

परभणी येथील सर्व्हे न.२ वरील वक्फ मालमत्ता अतिक्रमणाबाबत.

(११) * ७२५१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजपत्रात नमुद असलेल्या परभणी येथील सर्व्हे न.२ वरील अतिक्रमणे हटविण्या सोबतच ती मालमत्ता वक्फ मंडाळाच्या ताब्यात देण्याबाबतची मागणी परभणी-हिंगोली चे स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधींनी सन २०१४-१५ दरम्यान जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे पुराव्यासह सादर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मालमत्तावरील अतिक्रमणे हटविणे तसेच मालमत्ता वक्फ बोर्डाच्या ताब्यात देण्याबाबत जिल्हाधिकारी परभणी यांनी अपर जिल्हाधिकारी पथकाची नेमणुक केली आहे काय, तसेच संबंधतीतांना नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत काय, सदरील पथकाने चौकशी करुन अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सर्व्हे न.२ वक्फ मालमत्ता ताब्यात घेऊन तेथील अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत काय,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सर्वे नं. २ येथील जमिनीबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद व मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करता आली नाही असा जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांच्या दि. २९/६/२०१५ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे.

येवला येथील बसस्थानक आणि आगारव्यवस्थापक निवासस्थानासह व्यापारी संकुल बांधण्याबाबत

(१२) * ८०५३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला येथील बसस्थानक आणि आगार व्यवस्थापक निवासस्थानासह व्यापारी संकुल बांधण्याच्या बी.ओ.टी. तत्वावरील कामास शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास मंजुरी देवूनही माहे मे, २०१५ पर्यंत सदर काम सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाची अत्यंत दुरावस्था झालेली असल्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी या स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मागणी करूनही सदर कामे सुरू झालेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी शासनाने मंजुरी दिलेले काम तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४) तसेच बी.ओ.टी.तत्वावर सदर काम न करण्याबाबत शासनाचा विचार असल्यास प्रश्न भाग (१) व (२) मधील कामासाठी शासनस्तरावरुन अनुदान मंजुर करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांच्या बी.ओ.टी. तत्वावरील बांधकामांना शासनाने तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती दिलेली असून सर्व प्रकरणांची पुन:तपासणी करुन पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सोयाबीन बिज उत्पादन खाजगी कंपन्याच्या भावात मोठी तफावत असून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

(१३) * **७४३५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सोयाबीन बिज उत्पादन कंपन्यात महाबिज, खाजगी कंपन्या अंकुर, ईगल, कृषीधन ओसवाल सिड्स या कंपन्या कार्यरत असून सदर कंपन्याच्या (MRP) किंमतीत वेगवेगळी किंमत आढळून येत असल्याचे दिनांक २ मे, २०१५ ला उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगी कंपन्याच्या भावात मोठी तफावत असून त्यात शेतकऱ्यांची फसवणूक करुन लुट होण्याचा प्रकार होत असल्याने शासनाने यावर आळा घालण्यासाठी काही ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कोणती,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अंशतः खरे आहे.

(२) बियाण्याची महत्तम विक्री किंमत (MRP) निश्चित करण्यासाठी बियाणे कायद्यात तरतूद नसल्याने बियाण्याचे दर उत्पादक कंपनी स्वतः निश्चित करीत असतात. त्यामुळे दरात तफावत आहे. परंतु शेतक-यांची फसवणूक किंवा लुट होण्याचा प्रकार आढळून आलेला नाही.

(३) बियाणेबाबत तसेच कृषि निविष्ठांबाबत शेतक-यांची फसवणूक होणार नाही. यासाठी कृषि विभागांतर्गत स्वतंत्र गुणनियंत्रण यंत्रणा कार्यरत आहे या यंत्रणेमार्फत गुणनियंत्रणाचे सनियंत्रण केले जाते. बियाण्यांच्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून तक्रार प्राप्त झाल्यानंतर नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी करणे, शेतक-याला ग्राहक मंचात जाण्याचा सल्ला देणे व मदत करणे, नुकसानीसंदर्भात शेतक-याला मदत देण्याकरीता संबंधीत कंपनीला सूचना देणे, बियाणे अधिनियमातील तरतूदीनुसार कंपनीवर कारवाई करणे, इत्यादी प्रकारची कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भुमी अभिलेख कार्यालयात ई फेरफार या नविन संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याबाबत

(१४) * ७७४८ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १ एप्रिल २०१५ पासून भुमी अभिलेख कार्यालयात दस्त नोंदणी केल्यानंतर त्या नोंदी सात-बारा उताऱ्यामध्ये करण्याचे दृष्टीने त्या ई फेरफार या नविन संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रणालीनुसार दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी केल्यानंतर ती तलाठी कार्यालयात पोहचत नसल्याने दस्त नोंदीच्या संदर्भात तलाठी कार्यालयात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन अडचणी त्वरीत दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच चौकशी वा कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) (२), (३) व (४) अधिकार अभिलेखातील नोंदी करण्याच्या कार्यपध्दतीचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने ई-फेरफार प्रकल्प राज्यात सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पांतर्गत दस्त नोंदणी प्रणालीची सांगड संगणकीकृत फेरफार प्रणालीशी घालण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील १०५ तालुक्यांमध्ये ई- फेरफार या नवीन संगणकीय प्रणालीची सुरुवात झालेली आहे. दस्त नोंदणी व फेरफार प्रणालीमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

राज्यातील दुधाचे दर कमी झाल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आल्याबाबत

(१५) * ७९१२ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना मिळणारे दूधाचे भाव सातत्याने ढासळत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकरी अडचणीत येऊ नये म्हणून दुधाला योग्य भाव देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१), (२) व (३) राज्यात ऑक्टोबर ते एप्रिल या काळात दुधाच्या उपलब्धतेत वाढ होत असते. त्याप्रमाणे याही वर्षी दुधाच्या उपलब्धतेत वाढ झाली. याच काळात आतंरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटीच्या दरात मोठया प्रमाणावर घसरण झाल्यामुळे खाजगी दूध भुकटी प्रकल्पधारकांनी व काही सहरकारी संघांनी त्यांच्या दूध खरेदी दरात सुमारे रु.३/- ते रु.५/- इतकी कपात केली आहे हे खरे आहे. मात्र, शासनाने शासकीय दुधासाठी निश्चित केलेले खरदी दर दि. २५.११.२०१३ पासून रु. २०/- प्रति लिटर असे कायम असुन त्यात कोणताही बदल केलेला नाही.

(४) दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरीता शासनाने सहकारी दूध संघांकडील अतिरिक्त दूध आर्थिक तोटा सहन करुन शासकीय दराने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर दुधाचे दूध भुकटी व लोण्यात रुपांतर करण्यासाठी शासनाने उदगीर येथील दूध भुकटी प्रकल्प दि. ५.१२.२०१४ पासून कार्यान्वित केला असून इंदापूर येथील खाजगी दूध भुकटी प्रकल्प दि. १४.२.२०१५ पासून भाडेतत्वावर घेतला आहे.

उदगीर व इंदापूर येथे दि. २०.६.२०१५ अखरेपर्यंत सहकार क्षेत्रातील एकूण ४४९.४२ लाख लि. दुधाची स्विकृती करण्यात आली असून त्याद्वारे ३७३७.७४ मे. टन दूध भुकटीचे व १८१५.६२ मे. टन लोण्याचे उत्पादन झालेले आहे. याशिवाय केंद्र शासनाने दूध भुकटी निर्यातीवर बंद केलेले ५% प्रोत्साहनपर अनुदान पुन्हा सुरु करुन त्यात १०% वाढ करण्यासाठी केंद्र शासनास प्रस्ताव पाठविला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सीएट कंपनीने मुलुंड पूर्व येथील ३० एकर भूखंडापैकी सात एकर भूखंड ॲशफार्ड या खाजगी विकासकाला विकल्याबाबत

(१६) * ७८३६ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने संपादित करुन सीएट कंपनीला दिलेल्या मुलुंड पूर्व येथील ३० एकर भूखंडाचा वापर फक्त औद्योगिक प्रयोजनासाठी असतांना सीएट कंपनीने ३० एकर भूखंडापैकी सात एकर भूखंड से ॲशफार्ड या एका खाजगी विकासकाला विकल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) सीएट कंपनीस शासनाने मौजे भांडूप येथील जमीन-१५/१०/१९५८ व दि. १७/०१/१९६९ रोजी कंपनीबरोबर सनदेद्वारे भूसंपादन करुन उपलब्ध करुन दिली आहे.

संपादित करण्यात आलेल्या एकूण क्षेत्रापैकी २८०१०.४४ चौ.मी. क्षेत्राचा जमिनीचा वापरात बदल करुन रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी विक्री करण्याबाबत शासन ज्ञापन क्र. एलटीएच-०७/२००९/प्र.क्र.८८/ अ-२, दि. १८.०९.२०१० अन्वये सदर क्षेत्राची विक्री करणेसाठी परवानगी दिली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी त्यांच्या दि. ४.३.२०११ रोजीच्या आदेशान्वये सीएट कंपनीकडून २६९४३.४४ चौ.मी क्षेत्राच्या मुल्यांकनाच्या ५०% अनर्जित उत्पन्न रु. ६१.५६ कोटी शासन जमा करुन घेऊन विक्री करण्यास परवानगी दिली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयात विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत गाई खरेदीत झालेला गैरव्यवहार

(१७) * **६७१३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत गाई खरेदीमध्ये अकोला जिल्हयात गैरव्यवहार झाला असून जिल्हयातील ११ दुध उत्पादक सहकारी संस्थांनी गाई खरेदीत गैरव्यवहार व अनियमिता केली असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहार व अनियमीतता करणाऱ्या ११ दुध उत्पादक संस्था कोणत्या आहेत,

(३) असल्यास, प्राथमिक चौकशीत प्रत्येक संस्थेने किती रकमेची अनियमितता केली आहे,

(४) दि. ११ मार्च, २०१५ रोजी चाचणी लेखा परिक्षणाचे आदेश निर्गमित केले असूल लेखा परिक्षणाचे काम किती दिवसात पूर्ण होईल ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे आहे.

(२) १. गाडगेबाबा दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या.जामठी खु.ता.मुर्तीजापूर
२. तेज हनुमान दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या.मुर्तीजापूर
३. हिरामाता दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या. जामठी ता.मुर्तीजापूर
४. दत्तकृपा दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या.निंभा, ता.मुर्तीजापूर
५. राष्ट्रसंत तुकडोजी दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, कानडी, ता.मुर्तीजापूर
६. गोवर्धन दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, सालतवाडा, ता.मुर्तीजापूर
७. रामकृष्ण दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, राजदा, ता.बार्शिटाकळी
८. जयभोल दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, खेर्डाभगाई, ता.बार्शिटाकळी
९. किसान दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, बार्शिटाकळी
१०. वासुदेव महाराज दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, हिंगणी, ता.तेल्हारा
११. हरीहर दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, पिंपळखुटा, ता.अकोट

(३) व (४) एकुण ११ दूध संस्थांपैकी रामकृष्ण दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, राजदा, ता.बार्शिटाकळी व जयभोल दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या, खेर्डाभगाई, ता.बार्शिटाकळी या २ संस्थांचे अनुक्रमे सन १९८० पासून व सन २००३ पासून अंकेक्षण झालेले नसून सदर संस्था उपरोक्त कालावधीपासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत नऊ प्राथमिक दूध संस्थांचे लेखापरिक्षण चालू असून जुलै, २०१५ अखेर चाचणी लेखा परिक्षण पूर्ण होईल.

राज्यात अवकाळी पाऊस, वादळी वारा, गारपीट, यासारख्या नौसर्गिक आपत्तीने नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत मिळण्याबाबत

(१८) * ७१९७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.आनंदराव पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक धुळे, जळगाव व औरंगाबाद या जिल्ह्यात अवकाळी पाऊस, वादळी वारा, गारपीट, यासारख्या नौसर्गिक आपत्तीने मोठया प्रमाणात गहू, तांदूळ, डाळी, तेलबिया, आंबा, काजू, डाळींब, केळी, कांदा, हापूस, कोकम, करवंदे, फणस व कोकणचा रानमेवा इ. शेतपीक व फळपीकांचे लाखो हेक्टर क्षेत्राचे, घरांचे तसेच जिवित व वित्त हानीचे अतोनात नुकसान झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ ते मे, २०१५ या दरम्यानच्या कालावधीत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्तीत शेतीचे नुकसान झाल्यास केंद्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभुमीवर नुकसान भरपाईसाठीची ५० टक्के अट रद्द करण्यात येवून मदतीच्या रक्कमेत ५० टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात घेतल्याचे निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने कोरडवाहू शेतीसाठी ४ हजार ५०० रुपयांवरुन ६ हजार ८०० रुपये, बागायती क्षेत्रासाठी ९ हजार रुपयांवरुन १३ हजार ५०० रुपये आणि फळबागांसाठी १२ हजार रुपयांवरुन १८ हजार रुपये किमान दोन हेक्टरसाठी मदत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने नुकसानग्रस्त भागाची पहाणी करुन सर्वेक्षण करण्यात आले आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे होणारे शेतपीक व फळपीकांचे नुकसान टाळण्याबाबत शासनाने कोणती यंत्रणा राबविली आहे तसेच शेती उत्पादन वाढविण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे,

(६) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार नुकसानग्रस्तांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, अद्याप किती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे बाकी आहे व ती केव्हापर्यंत शेतकऱ्यांना देण्यात येईल,

(८) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.

(२) होय. केंद्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपीके व फळपिकांचे पंचनामे हे ५० टक्के ऐवजी ३३ टक्के व त्यापेक्षा जास्त नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत निर्णय दि. १.४.२०१५ पासून घेण्यात आला आहे.

(३) होय.

(४) शासनाने दिलेल्या निदेशाप्रमाणे सुधारित निकषानुसार सर्वेक्षण करण्यात येत आहे.

(५) शेतकऱ्यांना हवामानासंबंधी कृषी संदेश पाठविण्याची व्यवस्था पोर्टलद्वारे करण्यात आली आहे. तसेच पिकांवरील किडरोग व त्यावरील उपाययोजना याबाबतही कृषी संदेश देण्यात येत आहेत. पिक उत्पादकता वाढीसाठी प्रकल्प आधारित कृषि विस्तार कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

(६), (७) व (८) माहे नोव्हेंबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत झालेल्या नुकसानीसाठी आपदग्रस्तांना मदत वाटप सुरु असून, एप्रिल व मे, २०१५ मध्ये झालेल्या नुकसानीबाबत पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासकीय दुग्धव्यवसाय तोटयात असल्याचे कारण देत आरेच्या दुग्धजन्य पदार्थाचे खाजगीकरण करण्याचा होत असलेला प्रयत्न

(१९) * ६८५७ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अनिल तटकरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय दुग्धव्यवसाय तोटयात असल्याचे कारण देत आरेच्या दुग्धजन्य पदार्थाचे खाजगीकरण करण्याचा प्रयत्न राज्याच्या दुग्धविकास मंत्रालयाकडूनच वेगाने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) शासकीय-खाजगी सहभाग (PPP) या गोंडस नावाखाली आरेचा ब्रॅंड संपविण्यासाठी व आरेच्या कोट्यावधी रुपयांच्या मोक्याच्या जागेवर अनेकांचा डोळा असल्याने आरेच्या खाजगीकरणाचा डाव रचण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(३) संपूर्ण आरे प्रकल्पाच्या अत्याधुनिकीकरणासाठी रु. २०० कोटी व प्रसिध्दीसाठी काही रकमेची तरतूद केल्यास, आरे प्रकल्प तोटयातून अल्पावधीत बाहेर येऊ शकतो, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रकमेची तरतूद अथवा उपलब्धता करण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही अथवा उपाययोजना केलेली आहे,

(५) नसल्यास, आरे प्रकल्प पुन:श्च कार्यान्वित करुन पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५), (६) बंद पडलेल्या अथवा बंद पडण्याची शक्यता असणाऱ्या दुग्धशाळा व शितकरण केंद्राचे पी.पी.पी प्रक्रियेमार्फत पुर्नजीवन करण्याबाबत तांत्रीक सल्लागार नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

खामगाव (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषिपंपाना तात्काळ वीज जोडणी देणेबाबत.

(२०) * ८१४७ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०६१ ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव जि.बुलढाणा येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नविन कृषिपंपाची वीज जोडणी मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुन सुध्दा अद्यापर्यंत म.रा.वि.वि.कं. मर्या खामगाव यांनी नविन कनेक्शन दिले नाही, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत कनेक्शन न देण्याची कारणे काय,
(३) असल्यास शेतकऱ्यांना कृषिपंपाचे कनेक्शन तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासन काय उपाय योजना करणार आहे,
(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) नाही. पैशाचा भरणा करुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना ज्येष्ठता यादीप्रमाणे विज जोडणी देण्याची प्रक्रीया सुरु आहे. सन २०१२-१३ मध्ये २३१३ कृषीपंपाना, २०१३-१४ मध्ये २३५७ कृषीपंपाना व २०१४-१५ मध्ये मार्च २०१५ अखेर २१२३ कृषीपंपाना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) पैशाचा भरणा करुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना ज्येष्ठता यादीप्रमाणे विज जोडणी देण्याची प्रक्रीया सुरु आहे. कृषी पंपाचे कनेक्शन उपलब्ध करुन देण्यासाठी महावितरणतर्फे इन्फ्रा-२ या योजनंअंतर्गत कामे करण्यात येत आहेत तसेच विशेष कृषी पंप पॅकेज अंतर्गत खामगांव विभागाकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून कार्यादेश देण्यात आलेले आहेत व कामे सुध्दा सुरु झालेली आहेत.
(३) कृषी पंपाचे कनेक्शन उपलब्ध करुन देण्याकरिता महावितरण तर्फे इन्फ्रा-२ या योजनेंतर्गत कामे करण्यात येत आहेत तसेच विशेष कृषी पंप पॅकेज अंतर्गत खामगांव विभागाकरिता निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली असून कार्यादेश देण्यात आलेले आहेत व कामे सुध्दा सुरु झालेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: औरंगाबाद, बीड, नांदेड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे झालेली वित्त व जिवीत हानी

(२१) * ६७२४ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: औरंगाबाद, बीड, नांदेड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसामुळे मोठया प्रमाणात वित्त व जीवीतहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) आष्टी (जि.बीड), केज तालुक्यात आणि नांदेड येथे पावसामुळे मोठे नुकसान झाले असून पाऊस सुरु असतांना विजेच्या खांबाला चिकटून सावरगाव (ता.अंबाजोगाई) येथील इराजखान नेकमहंमद खान पठाण यांचा मृत्यू झाला असून जिल्ह्यात ठिकठिकाणी वीज पडून आठ जनावरे दगावली आहेत तसेच निवळी नेदरवाडीतील (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) अंकिता शांताराम म्हस्के या मुलीवर वीज पडल्यामुळे जागीच ठार झाली तर पानवळ बांदा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील म्हावळणकर यांच्या अंगावर वीज पडून जागची मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवकाळी पावसामुळे आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रक येथील बाळासाहेब जाधव यांच्या सहा शेळयांवर व वेरुळ येथील हंसराज सुपुत्रे यांच्या बैलावर वीज पडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नुकसानीची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नुकसानग्रस्तांना शासनाने आर्थिक मदतीचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अंशत: खरे आहे.

माहे मे, २०१५ मध्ये पडलेल्या अवकाळी पाऊस व वादळी वारे तसेच वीज पडून राज्यात विशेषत: खालील जिल्ह्यात झालेली वित्त व जीवीतहानी पुढीलप्रमाणे आहे.

१) औरंगाबाद जिल्ह्यात दि.१३ मे, २०१५ रोजी १ व्यक्ती मृत व १ व्यक्ती जखमी झालेला आहे.

२) बीड जिल्ह्यात ६ मोठी व ८ लहान जनावरांचा मृत्यू झाला आहे.

३) नांदेड जिल्ह्यात दि.१३ मे, २०१५ वा त्यासुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे जीवीत व वित्तहानी झालेली नाही.

४) रत्नागिरी जिल्ह्यात ३५६ घरांचे अंशत:, २ गोठ्यांचे पूर्णत: व १५ गोठ्यांचे अंशत: नुकसान झाले असून, वीज पडून १ व्यक्तीचा व १ जनावराचा मृत्यू झालेला आहे.

५) सिंधुदुर्ग जिल्ह्यात १८२ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, वीज पडून १ व्यक्तीचा व ४ जनावरांचा मृत्यू झालेला आहे.

(२) बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात वीज पडून ४ मोठी व ८ लहान जनावरे दगावली असून, केज तालुक्यातील २ मोठी जनावरे मृत झाली आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे सायगाव येथील पठाण एराज खान पि. नेक महमद खान यांची मृत्यू वीज पडून झालेला नसून, वीजेचा शॉक लागून झालेला आहे.

नांदेड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे जीवीत अथवा वित्तहानी झालेली नाही.

मौजे निवळी नेदरवाडी, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथील अंकिता शांताराम म्हस्के या मुलीच्या अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे.

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील पानवळ बांदा येथील श्री.माळवणकर यांच्या अंगावर वीज पडली नसून त्यांच्याबागेत काम करीत असलेले जानु वाघु वरक यांच्या अंगावर वीज पडून त्यांचा मृत्यू झाला आहे.

(३) होय, मौजे शेरी बुद्रुक येथील बाळासाहेब जाधव यांच्या ८ शेळ्यांवर व मौजे केरुळ येथील हंसराज सुपुत्रे यांच्या बैलावर वीज पडून मृत्यु आला आहे.

(४), (५) व (६) होय. औरंगाबाद जिल्ह्यातील मृत व्यक्तींच्या वारसास तसेच जखमींना मदत वाटप करण्यात आली असून, बीड जिल्ह्यातील मृत जनावराच्या मालकांना निकषानुसार मदत वाटप करण्यात आली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे सायगाव येथील पठाण एराज खान पि. नेक महमद खान यांचा मृत्यू वीजेचा शॉक लागून झालेला असल्याने व ही घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नसल्याने त्यांच्या वारसास मदत अनुज्ञेय नाही.

रत्नागिरी जिल्ह्यात झालेल्या घरांच्या व गोठ्यांच्या नुकसानीसाठी आपदग्रस्तांना व मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसाला निकषानुसार मदत वाटप करण्यात आली आहे. मृत झालेल्या १ जनावराचे शवविच्छेदन अहवाल प्राप्त होताच जनावराच्या मालकांला मदत देण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वीज पडून मृत झालेल्या जनावराच्या मालकाला तसेच मृत व्यक्तीच्या वारसाला निकषानुसार मदत वाटप करण्यात आली आहे. घराच्या झालेल्या नुकसानीसाठी, घटनेच्या दिवशी ६५ मि.मि. पेक्षा कमी पाऊस असल्याने केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्तीच्या निकषानुसार मदत अनुज्ञेय नाही.

केंद्र शासन पुरस्कृत आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतून शासनास प्राप्त झालेल्या जमिनीची विक्री केल्याबाबत

(२२) * ६९९६ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत वर्धा जिल्ह्यात १९८०.४९ हेक्टर जमीन शासनास प्राप्त झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूदान जमिनीचे हस्तांतरण व विक्री होत नाही पण नियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात शासकीय जमीन विक्री केल्याचे आरटीआयच्या माध्यमातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धा जिल्ह्यात भूदान चळवळीतून शासनास प्राप्त झालेल्या सदरहू जमीनीच्या महाघोटाळ्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत वर्धा जिल्ह्यात १९८०.४९ हेक्टर जमीन भूदान यज्ञ मंडळास प्राप्त झाली होती.

(२) वर्धा जिल्ह्यात काही प्रकरणी भुदान जमीनीचे अनधिकृत हस्तांतरण किंवा अकृषक वापर झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर माहीती ही माहीतीचा अधिकार अधिनियमान्वये पुरविण्यात आलेली आहे.

(३) व (४) याबाबत संबंधीत उपविभागीय अधिकारी यांना मध्यप्रदेश भुदान यज्ञ अधिनियम, १९५३ अन्वये कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी वर्धा यांच्या कार्यालयाच्या पत्र दिनांक २४/०६/२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने चौकशीच्या अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

(२३) * ७७५५ श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील वेणेखाले ग्रामस्थांच्या १० हेक्टर जमिनीवर १८ वर्षापूर्वी उरमोडी हे धरण उभारण्यात आले परंतू १८ वर्षानंतरही या प्रकल्पबाधीत कुटुंबाचे शासनाने पुनर्वसन केले नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्ह्यातील धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांपैकी श्रमिक मुक्ती दलाचे आंदोलन सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रकल्पग्रस्तांनी म्हसवड येथे पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत ग्रामस्थांच्या अनेक बैठका मंत्रालयात पार पाडल्या परंतु अद्यापही पुनवर्सन झाले नसल्याने शासनाने याबाबत कोणती आवश्यक ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) वेणेखोल गावाच्या पुनर्वसनाचा मुळ नियोजनात बदल करुन त्यांचे म्हसवड येथे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आलापल्ली येथे आरक्षित जागेवर बस स्थानक बांधणेबाबत

(२४) * ७३२२ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य महामंडळ अंतर्गत आलापल्ली हे गाव मुख्य रस्त्यावर असुन येथे बस स्थानकाकरिता आरक्षित असलेल्या जागेवर बस स्थानक अद्याप बांधण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी बसस्थानक बांधण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, कधीपर्यंत बांधण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्यासंदर्भात काही योजना प्रस्तावित आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे आहे.

(२) बसस्थानकाकरीता ७४८ चौ.मी. शासकीय जागा आरक्षित असून ती अपूरी असल्याने लगतची ९०० चौ.मी. अतिरीक्त जागा अशी एकूण १६४८ चौ.मी. जागेची आवश्यकता असल्याने सदर जागा प्राप्त करुन घेण्याकरीता राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) सदर जागा राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात आल्यानंतर बसस्थानकाचे बांधकाम करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा तालुक्यातील भीमा नदीकाठ परिसरातून मोठया प्रमाणात होत असलेली वाळू चोरी रोखण्याबाबत

(२५) * ७०२२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिद्धापूर, अरबळी, मांचणूर, ब्रम्हपुरी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) या गावातील भीमा नदीच्या पात्रात वाळू उपश्याचे प्रमाण वाढत चालले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू उपश्यामुळे नदीच्या पात्रातील पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील वाळू चोरी रोखण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) व (२) मंगळवेढा तालुक्यात अवैध वाळू उत्खननाची काही प्रकरणे निदर्शनास आली आहेत ही वस्तु:स्थिती आहे.

(३) मंगळवेढा तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी भरारी पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकांनी एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत ४३ प्रकरणांमध्ये रुपये ९२.६७ लाख दंड आकारण्यात आला आहे. तसेच ४३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील महावितरणच्या वीज वितरणात येणाऱ्या विविध समस्यांबाबत

(२६) * ७४८२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील महावितरणाच्या विज वितरणात येणाऱ्या विविध समस्यांसंदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, उर्जा यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरुस्तीच्या कामास मिळणारा अपुरा निधी यामुळे अनेक ठिकाणी महावितरणाची दुरुस्तीची कामे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) महावितरणाकडे आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हास्तरावर कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे वादळी वारा आणि पाऊस यामुळे हानी पोहोचलेल्या सुमारे १५ गावात दहा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी विद्युत पुरवठा होवू शकत नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्ह्यातील विज वितरण व्यवस्थेत सुधारणा करुन दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्धतेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) आपत्ती व्यवस्थापनकरिता महावितरणकडून उपाययोजना करण्यात येणार आहेत काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) सन २०१४-१५ सालासाठी बीड जिल्ह्याकरिता महावितरणने वीज वितरण व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ३७२.८३ लाख ऐवढया रक्कमेची तरतुद केली होती. तर सन २०१५-१६ सालासाठी महावितरणने वीज वितरण व्यवस्था देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ११७६.०२ लाख ऐवढया रक्कमेची तरतुद केली आहे.
(५) संपुर्ण जिल्ह्यात मोठया प्रमाणावर वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे, बऱ्याच ठिकाणी विद्युत यंत्रणेमध्ये बिघाड झाला व विद्युत खांब आणि तारा तुटल्या होत्या. सदर विद्युत खांब आणि तारांच्या दुरुस्तीसाठी ५० लाखांच्या निविदा मंडल स्तरावर काढण्यात आल्या असुन, ६ कंत्राटदारा मार्फत ही दुरुस्तीची कामे सुरु आहेत.

पालघर जिल्ह्यातील गौण खनिज अनुदानाचे वाटप होणेबाबत

(२७) * **७६६४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील गौण खनिज उत्खनाच्या स्वामीत्व धनातून संबंधित ग्रामपंचायतींना अनुदान वाटप झाले नसल्याबाबत सामाजिक कार्यकर्ते भद्रेश शहा यांनी मे महिन्यात उपोषण व धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपोषणाबाबत शासनाने दखल घेतलेली आहे काय,
(३) असल्यास, गौण खनिजे अनुदानाचे वाटप, अपुरी तरतूद आणि स्वामीत्वधन वसुली व वितरण याचे ऑडीट इ. मागण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून कार्यवाही झाली आहे काय,
(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) श्री.भद्रेश शहा यांनी गौणखनिजाच्या स्वामित्वधनापोटी शासनास प्राप्त झालेल्या रकमेमध्ये ग्रामपंचायतीना विकास कामासाठी अनुदान देण्याच्या मागणीसाठी दिनांक १८.०५.२०१५ पासून तहसिल कार्यालय पालघर समोर उपोषण व धरणे आंदोलन सुरू केले होते.

(२), (३) व (४) गौण खनिजाच्या स्वामित्वधनापोटी प्राप्त रकमेमधून ग्रामपंचायतीना त्याच्या विकास कामासाठी किती अनुदान प्राप्त झाले व त्यापैकी किती अनुदानाचे वाटप करण्यात आले याबाबतची माहीती संबंधित तहसिलदार यांच्याकडून मागविली असून, अनुदान प्रलंबित असल्यास त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे श्री.भद्रेश शहा यांना जिल्हाधिकारी पालघर यांनी दिनांक २१ मे, २०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील परिवहन महामंडळाच्या आगारातील जुन्या झालेल्या बसेस बदलण्याबाबत

(२८) * ७६१८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील अनेक बस भंगार झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून येथील आगाराचा कारभार ढेपाळला असून या ठिकाणी अधिका-यांचे नियंत्रणच नसल्याने कर्मचारी बेशिस्त झाले आहेत. त्यांच्यावर कुणाचाच वचक नाही, परिणामी प्रवाशांना सुविधा मिळणे अवघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन येथील कारभार सुधारणा करुन प्रवाशांना सुविधा देणार काय, तसेच जुन्या झालेल्या व १५ लाख किलोमीटर चाललेल्या बसेस बदलण्यात येणार आहे काय, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री. दिवाकर रावते : (१) व (२) हे खरे नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळातील ८ वर्षावरील आयुर्मान व ५.५० लाख कि.मी पूर्ण झालेली वाहने टप्याटप्याने वित्तीय उपलब्धतेनुसार मोडीत काढण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे धोरण आहे.

पांढरकवडा आगारात एकूण ६३ बसेस असून यापैकी, १५ लाख कि.मी. झालेली एकही बस चालनात नाही. सन २०१३-१४ मध्ये आगाराला एकूण ५ नविन बसेस देण्यात आल्या असून सन २०१४-१५ मध्ये आजपर्यत ३ नविन बसेस देण्यात आल्या आहेत.

राज्यातील सर्व शाळांमध्ये उर्दु विषय ऐच्छिक करण्याबाबत

(२९) * ७३०० श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांमध्ये उर्दु विषय ऐच्छिक करण्याची अल्पसंख्यांक मंत्र्यांनी घोषणा केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्दु शिकविणाऱ्या शिक्षकांची व्यवस्था प्रत्येक शाळांमध्ये करण्यात येणार आहे काय,

(३) हा अभ्यासक्रम प्रत्येक शाळांमध्ये केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अंशत: खरे आहे.

मराठी शाळांमध्ये इतर ऐच्छिक भाषांच्या पर्यायांमध्ये उर्दू भाषेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(२) व (३) इयत्ता ८ वी पासून सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये उर्दू भाषा संयुक्त भाषा म्हणून ऐच्छिक स्वरुपात अभ्यासता येते.

मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी ज्वारी व मका या धान्याचे उत्पादन वाढण्याच्या नावाखाली १३२ कोटीच्या सबसिडीचा गैरव्यवहार केल्याबाबत

(३०) * ७३५५ श्री.विजय गिरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या काही वर्षात राज्यातील तत्कालीन आघाडी सरकारने ज्वारी व मका या धान्यांपासून मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना ज्वारीचे उत्पादन वाढावे यासाठी तब्बल १३२ कोटींची सबसिडी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळात ज्वारीचे उत्पादन राज्यात सतत घटत असल्याने सदर मद्यनिर्मिती करीता बाजार समितीत विक्रीसाठी दिले जाणारे धान्य मद्य निर्मितीसाठी विकण्याची परवानगी दिल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्वारीचे उत्पादन कमी होत गेले असून त्यापासून मद्य निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी मात्र सबसिडीचे १३२ कोटी रुपये वापरल्याचा ठपका कॅगने आपल्या अहवालात नमूद केला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्वारीच्या लागवडीच्या क्षेत्रात व उत्पादनात वाढ होईल यादृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक १६/५/२००७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार मद्यार्क निर्मितीकरिता आसवनींना चालना देण्यासाठी व खराब धान्याला योग्य भाव मिळवून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासन निर्णय, दिनांक ८ जून, २००७ अन्वये राज्यातील उत्पादित धान्यापासून मद्यार्क निर्मितीकरिता "धान्याधारित आसवनी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य-२००७" ही योजना अमलात आणली होती. या योजनेनुसार मद्यार्क निर्मिती करणाऱ्या आसवनींना विहीत दराने रु. १३२.८१ कोटी एवढे अर्थसहाय्य हे राज्यातील धान्याधारित मद्यार्कापासून निर्मिती झालेल्या मद्याच्या विक्रीतून शासनास प्राप्त झालेल्या महसूलाच्या रु. ३,८५५ कोटींमधून प्रदान करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय. "धान्याधारित आसवनी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य-२००७" ही योजना शासनाने दिनांक ३१.१२.२०१३ पासून बंद केली आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मोटार अपघातात चूक नसताना जखमी झालेल्या तसेच मृत व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या मदतीचे दावे प्रलंबित असल्याबाबत

(३१) * ८२४६ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोटार अपघातात चूक नसताना जखमी झालेल्या तसेच मृत व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या मदतीचे २१ हजार दावे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दावे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर प्रलंबित दावे तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. दिवाकर रावते : (१) राज्यात दिनांक ३१.०५.२०१५ पर्यंत एकूण ८२,४७५ दावे प्रलंबित आहेत.

(२) सदर दावे प्रलंबित राहण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

अ) दावेदारांकडून किंवा त्यांच्या वकिलांकडून सादर होणाऱ्या दाव्यामध्ये जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र, शवविच्छेदन प्रमाणपत्र वेळेत दाखल होत नाहीत.

ब) काही दाव्यामध्ये प्रतिवादी हे इतर राज्यातील असल्यामुळे त्यांना लवकर नोटिसा बजावून होत नाहीत, तसेच काही दाव्यामध्ये विमा पॉलिसी आढळून येत नाही. तर काही दाव्यामध्ये साक्षिदार हजर न केल्यामुळे दावे प्रलंबित राहतात.

क) राज्यात एकूण १४ मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे आहेत (मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर) तसेच इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी सदर दावे हे जिल्हा न्यायालयात चालविले जातात. त्या ठिकाणी इतर प्रकरणे असल्यामुळे मोटार अपघाताखालील प्रकरणे प्रलंबित राहतात.

(३) मोटार अपघात दावा न्यायाधिकरणातील जास्तीत जास्त प्रकरणे मा. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार लोक न्यायालयात ठेवून निकाली काढण्यात येत आहेत. तसेच मध्यस्थी केंद्राकडे आपसी तडजोडीकरिता दावे ठेवण्यात येतात.

भूमी क्लासिक, मालाड (पश्चिम) मुंबई या गृहप्रकल्पात झालेला गैरव्यवहार

(३२) * **६७७७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पश्चिमेकडील लिंकिग रोड या परिसरातील भूमी क्लासिक या खाजगी विकासकाच्या गृहप्रकल्पाचा भूखंड शासनाकडे जमा करण्याचे आदेश उपनगर जिल्हाधिकारी यांनी माहे मे, २०१५ मध्ये विकासकास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९ वर्षापूर्वी विकासकासोबत झालेला करार बेकायदा असल्याचे निदर्शनास आल्यामुळे २५७ रहिवाशांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खाजगी गृहप्रकल्पात सरकारी अधिकाऱ्यांचे संगनमत असून सदर भूखंड घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले,

(४) तदनुसार सदर भूखंड घोटाळाप्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) मौ.मालाड, ता.बोरीवली येथील स.नं.५०४ अ पै., न.भू.क्र.१४०६-जी/१ पै., क्षेत्र ८६१६.४० चौ.मी. ही मिळकत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ च्या पोटकलम (५) मधील तरतुदीनुसार शासन जमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक १३.०४.२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ च्या पोटकलम (४) अन्वये चौकशीसाठी विषयांकित ठिकाणच्या इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या एकूण २५७ व्यक्तींना सामनेवाला म्हणून सुनावणीची संधी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिली आहे. तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक १३.४.२०१५ रोजीच्या आदेशाविरुद्ध अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल झालेले आहे. सदर अपिलाची पुढील सुनावणी दिनांक २१.७.२०१५ रोजी आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ (४) अंतर्गत चौकशी झाली आहे.

सदर चौकशीत गणपत पांगल्या तबाली ही व्यक्ती व मे.एव्होरा बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्यामध्ये झालेला करार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६-अ च्या पोटकलम (१) मधील तरतुदींविरोधात आढळून आल्याने त्यान्वये झालेले हस्तांतरण हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ - अ च्या पोटकलम (५) अन्वये अवैध असल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १३.०४.२०१५ रोजीच्या आदेशान्वये जाहिर केले आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासनाने दिलेले आहेत.

लांजा (जि.रत्नागिरी) येथे एस.टी.स्थानक उभारण्याबाबत

(३३) * ७६९५ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल तटकरे, श्री.गुरुमुख जगवानी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) येथे जिल्ह्यात सर्वात मोठे आणि नव्याने मध्यवर्ती अद्यावत एस.टी.स्थानक उभारण्याचा निर्णय घेऊन अद्याप सदर बस स्थानकाच्या कामाला सुरूवात करण्यांत आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर प्रस्तावास मंजूरी देऊन लवकरात लवकर बस स्थानक उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१), (२) व (३) रत्नागिरी विभागातील रा.प.लांजा येथे सन १९७७ पासुन बसस्थानक कार्यान्वित असुन तेथे प्रवाशांसाठी ३ फलाट उपलब्ध आहेत. गर्दीचे वेळी प्रवाशांना बसस्थानकावर असलेले ३ फलाट कमी पडत होते म्हणून सन २०१४ मध्ये स्थानिक पातळीवर ५० फूट लांब व १० फूट रुंदीची एक तात्पुरती प्रवाशी शेड स्वतंत्ररित्या बांधण्यात आले आहे. तसेच बसस्थानकाच्या वाहनतळाचे डांबरीकरण केलेले आहे.

सदर बसस्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवल्याबाबत

(३४) * ७०७५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद नगरपालिकांतर्गत रत्नाळी सज्ज्याचे तलाठी यांच्या चुकांमुळे रत्नाळीचे जवळपास ३३ दुष्काळग्रस्त शेतकरी शासनातर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानापासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नाळी येथील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे अंशत: खरे आहे. रत्नाळी या गावातील बाधीत शेतकऱ्यांना दि. ७.४.२०१५ रोजी रु. ४१,८०,८५०/- दुष्काळी अनुदान वाटप करण्यात आले आहे. तथापि काही शेतकरी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानापासून वंचित राहिलेबाबत तहसिल कार्यालयास तक्रार प्राप्त झाल्याने नायब तहसिलदार मार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये अल्प, अत्यल्प भूधारक ३० शेतकरी व बहूभूधारक ४ शेतकऱ्यांना अनुदान वाटप शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) नायब तहसिलदार यांचेमार्फत चौकशी करुन दुष्काळी अनुदानापासून वंचित राहिलेल्या ३४ शेतकऱ्यांची पुरवणी यादी तयार करुन दि. ७.७.२०१५ रोजी रक्कम रु. १,३३,७५० अनुदान वितरणासाठी बँकेला शेतकऱ्यांच्या यादीसह देण्यात आलेले आहे.

(३) दि. ७.७.२०१५ रोजी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी अनुदान बँकेत जमा करण्यात आलेले आहे. संबंधित सजाचे तलाठी यांना उपविभागीय अधिकारी, धर्मावाद यांनी त्यांच्या दि. ७.७.२०१५ चे आदेशन्वये निलंबीत केले आहे.

टॅक्सी व रिक्षा मिटरची चाचणी घेण्याबाबत

(३५) * ८२१० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशातील टॅक्सी व रिक्षाचे भाडेवाढ झाल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी टॅक्सी व रिक्षा मिटर मधील रिकॅलिब्रेशनमध्ये करावयाची आवश्यक ती तांत्रिक सुधारणा न केल्याने प्रवाशांना मोठ्या प्रमाणात भाड्यापोटी अधिक पैसे द्यावे लागल्याची तक्रार ग्राहक पंचायतीने संबंधितांकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(३) प्रश्न भाग (१) मधील टॅक्सी व रिक्षा मीटरमध्ये असलेला दोष मिटरची चाचणी घेवून ती दूर करण्यात आला आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : (१) होय. मुंबई ग्राहक पंचायतीने दिनांक १६.०८.२०१४ व २७.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये अशा आशयाचे निवेदन दिले होते.

(२) यासंदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयीन याचिका क्र. १५०/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने रिकॅलिब्रेशन केलेल्या ऑटोरिक्षा/टॅक्सीनाच भाडेवाढ मंजूर केल्याने रिकॅलिब्रेशन नेलेल्या ऑटोरिक्षा/टॅक्सींना वाढीव दराने भाडे आकारणी करणे शक्य झाले नाही.

मुंबई महानगर क्षेत्रामध्ये विशेष मोहिमेद्वारे ४५ दिवसानंतर बहुतांशी ऑटोरिक्षा व टॅक्सीचे मीटर रिकॅलिब्रेशन कार्य पूर्ण करण्यात आले.

(३) ऑटोरिक्षा/टॅक्सी मीटरचे रिकॅब्लिकेशन केल्यानंतर मान्यता प्राप्त संस्थेकडून (आय.टी.आय) त्यांची तपासणी करण्यात येते. तपासणी संस्थेकडून मीटर सील करुन प्रमाणपत्र देण्यात येते. सदर मीटर ऑटोरिक्षा/टॅक्सींना बसवून परिवहन कार्यालयात सादर केल्यावर त्या प्रत्यक्षात रस्त्यावर चालवून मीटर योग्य भाडे दर्शवित असल्याची खात्री झाल्यानंतर पुन्हा आणखी एक सिल करण्यात येत असते. त्यामुळे मीटरमध्ये असलेला दोष चाचणी घेऊन दुर झाल्यानंतरच सीलबंद करण्यात येते.

खाजगी बेकायदेशीर बसेसवर कार्यवाही करण्याबाबत

(३६) * ७११२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील प्रवाशांच्या जिवाशी खेळणा-या तसेच रिक्षाचालकांच्या व्यवसायावर गदा आणणा-या खासगी बेकायदेशीर बसेसवर कारवाई करण्यासंदर्भात ठाणे शहर रिक्षा प्रवासी संयुक्त कृती समितीच्यावतीने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील खाजगी बेकायदेशीर बसेसवर कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे आहे. या संदर्भात ठाणे शहर रिक्षा प्रवासी संयुक्त कृती समितीने दि. ०६.०४.२०१५ रोजी मोर्चा काढून ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयास निवेदन दिले होते.

(२) अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसचा शोध घेण्यासाठी ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत दि. ०१.०५.२०१५ ते ३०.०६.२०१५ या कालावधीत एकूण २२८३ वाहने तपासण्यात आली. त्यापैकी दोषी आढळलेल्या ३७९ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण तालुक्यातील वधणे ग्रुप ग्रामपंचायत येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरवस्था दूर करण्याबाबत

(३७) * ७१७६ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील वधणे ग्रुप ग्रामपंचायत येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरवस्था झाल्याने आजारी जनावरांना उपचार न मिळाल्याने ते मृत पावत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे नव्याने बांधकाम करणे व तेथे आवश्यक ती औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) दवाखान्याच्या इमारतीची दुरावस्था झालेली आहे हे खरे आहे. तथापि, माहे मे, २०१५ या दरम्यान आजारी जनावरांना उपचार न मिळाल्याने मृत पावत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) पशुवैद्यकीय दवाखाना वधणे ता.उरण येथील इमारतीचे नव्याने बांधकामास वित्तीय वर्ष सन २०१२-२०१३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून रूपये १०.०० लक्ष निधी वितरीत करणेत आला होता. तसेच जिल्हा परिषद सेस व जिल्हा वार्षिक योजनेतून सदरचे दवाखान्यास आवश्यक ती औषधे उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सद्यस्थितीत दवाखान्यात औषधांचा मुबलक साठा उपलब्ध आहे.

(३) पशुवैद्यकीय दवाखाना वधणे, ता.उरण येथील नवीन इमारतीच्या कामाची ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, सदर निविदेस दोनदा मुदतवाढ देऊनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने सदरची रक्कम अखर्चित राहिली आहे.

राज्यात वीज मनोरा उभारण्यासाठी व्याप्त जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

(३८) * ७४४८ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विज कंपन्यांकडून चारशे ते बाराशे के.व्ही. क्षमतेचे मोठे मोठे टॉवर शेतकऱ्यांच्या जमिनीवर उभारले जात असून एका टॉवरसाठी १० गुंठे जमीन लागते तर त्यावर तार ओढण्यासाठी किमान दोन ते ३ एकर जमीनी वरील पिकांचे नुकसान होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान व टॉवरसाठी घेतलेल्या जमीनीचा मोबदला फारच कमी प्रमाणात दिला जातो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेणार आहे काय,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) नाही.

(२) नाही, पिकांच्या नुकसानीची भरपाई शासनाच्या संबंधित विभागाकडून मुल्यांकन करुन घेऊन दिली जाते. तसेच मनो-याने व्याप्त जमिनीचा मोबदला, ऊर्जा विभागाच्या दिनांक ०१.११.२०१० च्या शासन निर्णयानुसार दिला जातो.

(३) होय,

याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात भुमी अभिलेख कार्यालयातील जिरायती व बागायती नोंदी बाबत

(३९) * **७२८०** **श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या भूमी अभीलेख विभागांतर्गत येणाऱ्या उप अधिक्षक भूमी अभिलेख विभागामध्ये जिरायती शेतीचे ०.८१ आर प्रमाणे तर बागायती शेतीचे ०.२१ आर याप्रमाणे आणि हंगामी बागायती शेतीचे ०.४० आर याप्रमाणे तुकडे पाडण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागांतर्गत शेतीच्या जमिनीमध्ये बदल करण्याकरीता जी कारणे असतात ती कारणे नमुना १२ मध्ये नमूद असतात व भूमी अभीलेख कार्यालयाला देण्यात येणारा नमूना ७ मध्ये याबाबतची कोणतीही नोंद उपलब्ध नसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमीनीचे तुकडे पाडण्याकरीता आवश्यक ती माहिती भुमी अभिलेख कार्यालयाकडे नसल्यामुळे जमीनीचे तुकडे पाडण्याकरीता शेतकऱ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, जमिनीच्या झालेल्या बदलाबाबतची नमूना १२ मध्ये नोंद असलेली सर्व माहीती नमूना ७ मध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, पर्यायी कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियमाचे कलम २ (४) नुसार "तुकडा" या संज्ञेची व्याख्या दिली असून त्यानुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असल्यास त्यास "तुकडा" असे संबोधले जाते. सदर अधिनियमाचे कलम ४ नुसार जिल्हा सल्लागार समितीच्या सल्ल्याने असे प्रमाणभूत क्षेत्र ठरवताना जमिनीच्या वर्ग, प्रकार व प्रतीनुसार ज्या किमान क्षेत्राचे भूखंडात लागवड केल्यास ती किफायतशीर ठरेल या आधारे अधिनियमाचे कलम ५ नुसार प्रमाणभूत क्षेत्र निर्धारीत केले जाते. त्यामुळे जमिनीच्या वर्ग, प्रकार व प्रतीनुसार हे प्रमाणभूत क्षेत्र राज्याच्या विविध भागात बागायत व जिरायतीसाठी वेगवेगळे निर्धारीत करण्यात आले आहे.

(२) गाव नमुना नं. १२ मध्ये पिकांखालील क्षेत्राचा तपशिल, जलसिंचनाची साधने इ. माहिती नमुद असते. तर नमुना ७ मध्ये सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्र पोटखराबासह तसेच भोगवटादाराचे नांव आणि कुळ व इतर हक्क असल्यास त्यासंबधी नोंद असते.

(३) सहधारकांनी जमीनीच्या विभाजनासाठी अर्ज केल्यानंतर महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम च्या उपबंधास अधीन राहून जमिनीचे विभागणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड तालुक्यातील खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(४०) * ७२३९ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सिल्लोड तालुक्यातील संपूर्ण १३१ गांवाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त गावांना नुकसान भरपाई देण्याबाबत प्रशासनाचे दुर्लक्ष व खासगी बँकाची शेतकऱ्यांबाबत अनास्था यामुळे उपलब्ध अनुदान मिळण्यास उशीर होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तालूक्यातील शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बँकेकडून NEFT न झालेले चूकीचे खातेक्रमांकाची खातेदारांची यादी तलाठी यांच्याकडून दुरुस्त करुन घेवून बँकनिहाय वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

घोडबंदर (जि.ठाणे) येथील भुमी अभिलेख कार्यालयातील गैरप्रकाराबाबत

(४१) * ७६४३ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) परिसरात आर.एन.ए. कार्पोरेशनची सहा प्रकरणे मोजणीसाठी भूमी अभिलेख कार्यालयात दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त जमीनीची मोजणी दिनांक २० ते ३० सप्टेंबर, २०१३ या कालावधीत करुन अहवाल देण्यात येऊन सदर प्रकरणे निकाली काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी काही दिवसांनी बनावट सहीद्वारे लिपिक, श्री.कदम व संबंधित अधिकारी यांनी संगनमातने आर.एन.ए.च्या सर्व नकाशावर (उदा.६९३१, ६९३२, ६९३५, ६९३९, ३९४०) फेरफार केल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१), (२), (३), (४) व (५) मे.आर.एन.ए. कॉर्पोरेशनने मौजे घोडबंदर येथील वेगवेगळया सर्व्हे नंबरच्या मोजणीसाठी ६ प्रकरणे उपअधिक्षक भूमी अभिलेख, ठाणे कार्यालयात दाखल केली होती. सदर प्रकरणांमध्ये दि. २०.९.२०१३ ते ३०.९.२०१३ या कालावधीमध्ये मोजणी करुन दिनांक २३.१०.२०१३ रोजी मोजणी नकाशाच्या "क" प्रती देवून प्रकरणे निकाली करण्यात आली. त्यानंतर मो.र.नं. ६९३१/२०१३ च्या मोजणी नकाशावर असणारी स्वाक्षरी खोटी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर तपासणी केली असता मो.र.नं. ६९३१, ६९३२, ६९३५, ६९३९, ६९४०, ६९४१ या सर्व नकाशांवर भूकरमापक, छाननी लिपिक, मुख्यालय सहाय्यक यांच्या बनावट व खोटया स्वाक्षऱ्या असल्याचे आढळून आले. केवळ श्री.देवेंद्र मांजरे या भूकरमापकाची स्वाक्षरी खरी व तंतोतंत जूळणारी असल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये श्री.देवेंद्र मांजरे भूकरमापन हे प्राथमिकदृष्टया दोषी आढळल्याने त्यांना दि. १.०४.२०१५ पासून निलंबित करणेत आले आहे. तसेच त्यांचेविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करणेत आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(४२) * ९०६४ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त क्षेत्रात शेतीविषयक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांची ८८२ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे उपलब्ध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असून कृषी विभागातील कामे रखडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) गट-अ संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-ब संवर्गातील पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क संवर्गातील पदे भरण्यासाठी बिंदुनामावल्या अदयावत करुन घेवून प्रमाणित करुन घेण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे. ती प्राप्त झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. ०२/०५/२०१५ नुसार मागणीपत्र प्राप्त करुन कृषी आयुक्तालयस्तरावर केंद्रीय पध्दतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. गट-ड संवर्गातील पदे केंद्रीय पध्दतीने बिंदुनामावली तपासुन भरणेबाबतच्या सुचना संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांना कृषि आयुक्तालय स्तरावर देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मच्छिमारांना मासेमारी करण्यासाठी घालून दिलेली १२ नॉटीकल माईल्सची मर्यादा वाढवून देण्याबाबत

(४३) * ९१५८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल तटकरे : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ता.गुहागर (जि.रत्नागिरी) येथील मासेमारी क्षेत्रामध्ये १२ नॉटीकल माईल्सच्या आत परराज्यातील २०० ते ४०० अश्वशक्तीच्या इंजीन असलेले मोठया आकाराच्या यांत्रिक नौका मासेमारी करीत असल्याने राज्यातील मच्छिमारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील मच्छिमारांना घालून दिलेली १२ नॉटीकल माईल्सची मर्यादा वाढवून २४ नॉटीकल माईल्स इतकी करावी अशी मागणी राज्यातील मच्छिमारांनी माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(४) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यावर केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) १२ नॉटीकलची मर्यादा वाढवून २४ नॉटीकल माईल्स करणे ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे.

लातूर जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी प्रत्यक्ष शेतात न जाता कार्यालयात बसून नकाशा तयार करण्याचे काम करत असल्याबाबत

(४४) * ९२२९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी प्रत्यक्ष शेतात न जाता कार्यालयात बसून नकाशा तयार करण्याचे काम करतात त्यामुळे सरासरी १० पैंकी ८ मोजण्या भूमीलेख कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून चुकीच्या निघत असतात ही बाब केलेल्या पाहणीत निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारची तफावत येण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) जमिनीच्या मोजणी व नोंदी अचूकपणे होण्याचे दृष्टीने शासनाकडून काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यात उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, क्रिमिलियर व राष्ट्रीयत्वाचे दाखले त्वरील उपलब्ध होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही

(४५) * ९७०५ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यात उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, क्रिमिलियर व राष्ट्रीयत्वाचे दाखले मिळण्यास विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना अडचणी येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अनेक ठिकाणी सेतू सुविधा केंद्र सुरु केली होती, परंतु सध्या तीही बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना सदर दाखले त्वरीत उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) चाळीसगांव तालुक्यात १८ महा-ई सेवा केंद्र आहेत. त्या मार्फत विद्यार्थ्यांना विविध दाखले वितरीत करण्यात येत आहेत. तसेच जळगांव जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्र चालविणेकरिता कंपनीची निवड करण्यात आली असून कराराबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

हिंगोली जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या बसस्थानकाची झालेली दुरवस्था

(४६) * १००११ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या बसस्थानकात सोयीसुविधांचा अभाव असून बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थानकाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर बसस्थानकात मुलभूत व भौतिक सोयीसुविधा पुरविण्याबाबत व सदर स्थानकांची दुरवस्था सुधारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे नाही.

(२) विभागातील अधिकारी आगार तपासणीसाठी जातात तेव्हा बसस्थानकाचीही पाहणी केली जाते व त्यांना आढळलेल्या त्रुटीबाबत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. दिनांक ०७.०७.२०१५ रोजी विभाग नियंत्रक, परभणी यांनी पहाणी केली आहे.

(३) बसस्थानकाची इमारत सुस्थितीत असुन बसस्थानकात आवश्यक मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. सद्यःस्थितीत वाहनतळ खराब झालेला असुन दुरुस्तीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे माणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खांबावरील तारा तुटून शेती व बागायतींचे लाखो रूपयांचे झालेले नुकसान

(४७) * १००२८ श्री.विजय सावंत : ता.प्र.क्र. ३१०० ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील गट नं ४३०, ४९८, ६९४ व ५०५ मधील शेती व बागायतीमध्ये दिनांक १ एप्रिल, २०११ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खाबांवरील तारा तुटून लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानीसंबंधी लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान व संचालक, महावितरण यांना दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास नुकसान भरपाई अदा करण्यासंबंधी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगिक निवेदनानुसार मा.ऊर्जा मंत्री यांनी संचालक महावितरण यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी निर्देश देऊनही अद्यापही नुकसान भरपाई गरीब शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नुकसानग्रस्तांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) होय.

(३) नुकसान भरपाई देण्याबाबत महावितरणाचे स्वयंस्पष्ट परिपत्रक वितरीत केले आहे. यामुळे वेगळे आदेश देण्याची आवश्यकता नाही. नुकसान भरपाई देण्यासंबंधीचे परिपत्रक सर्वांना बंधनकारक आहे.

(४) महावितरणच्या कार्यालयाकडून मा.तहसिलदार खेड व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे दिनांक १०.०१.२०१४, दिनांक १८.०१.२०१४, दिनांक ३१.०१.२०१४, दिनांक ११.०४.२०१४ व दिनांक ११.०४.२०१४ अन्वये मुल्यांकन व इतर कागदपत्रे मिळण्यासाठी पाठपुरावा केलेला आहे. त्यानंतर ता.कृषी अधिकारी खेड यांनी दिनांक ११.११.२०१४ अन्वये दिलेल्या पत्रात असे स्पष्ट नमूद केले आहे की, कृषी विभागामार्फत फक्त जिवंत झाडांचे मुल्यांकन केले जाते. तसेच शॉर्ट सर्कीटमुळे शेतक-यांच्या झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे मुल्यांकन देता येत नाही. तहसिलदार खेड व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून झाडांचे मुल्यांकन मिळावे यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) व (६) विभागीय कार्यालय खेड तहसिलदार खेड व तालुका कृषी अधिकारी यांचेकडून झाडांचे मुल्यांकन मिळावे यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

राज्यात अल्पसंख्याक म्हणून दर्जा असलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये असलेल्या त्रुटीबाबत

(४८) * **१००६६ श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्याक म्हणून दर्जा असलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये असलेल्या त्रुटी अल्प संख्याक शाळांतील शैक्षणिक दर्जा व संस्थांच्या शैक्षणिक कारभार या अनुषंगाने राज्यातील २३०० अल्प संख्याक शैक्षणिक संस्थांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीसाठी शासनाने कोणते निकष निश्चित केले आहेत,

(३) असल्यास, ज्या अल्प संख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये आढळून येणाऱ्या त्रुटीच्या अनुषंगाने शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अंशत: हे खरे आहे.

दक्षिण मुंबईतील काही अल्पसंख्यांक संस्थाच्या शाळांनी त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या विद्यार्थ्यांना अल्प प्रमाणात प्रवेश दिल्यामुळे अशा संस्थांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(२) व (३) या प्रकरणी शासन निर्णय अ.वि.वि. अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५ दिनांक २७.०५.२०१३ प्रमाणे विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

ठाणे जिल्ह्यातील गावदेवी मैदानाजवळ पत्रकारांसाठी उभारलेले पत्रकार भवन वापरात आणण्यासंदर्भात

(४९) * ६७८५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संजय दत्त : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील गावदेवी मैदानाजवळ पत्रकारांसाठी शासनाने दिलेल्या जमिनीवर पत्रकार भवन उभारण्याचे कंत्राट श्री.राजन शर्मा या कंत्राटदाराला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रकार भवन उभारुन २२ वर्षे उलटली तरी पत्रकारांना त्यांच्या हक्काची जागा अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब (१) व (२) नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पत्रकार भवन वापरात आणण्याबाबत शासनामार्फत तातडीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) मौजे ठाणे, ता.जि.ठाणे येथील पत्रकार संघाच्या भवनासाठी शासनाने वाटप केलेल्या जमीनीवर पत्रकार भवन उभारण्याचे कंत्राट ठाणे जिल्हा पत्रकार संषाचे कार्यकारी मंडळ व विश्वस्त यांनी श्री. राजन बद्रीप्रसाद शर्मा यांना दि. २१/११/१९९१ च्या नोटराईज बांधकाम व विकास कराराने दिल्याचे दिसते.

(२), (३), (४) व (५) ठाणे जिल्हा पत्रकार संघास मंजूर करण्यात आलेल्या जमिनीसंदर्भात शर्तभंग आढळून आल्याने उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी दि. ३०/११/१९९९ रोजी सदर जमीन सरकार जमा करण्याचे आदेश पारित केले आहेत. प्रस्तुत प्रकरणी सुरु करण्यात आलेल्या शर्तभंग कारवाई विरुध्द श्री. राजन बद्रीप्रसाद शर्मा यांनी सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) ठाणे यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक ४०१/१९९९ दाखल केला असून सदर दाव्यात मा. न्यायालयाने "जैसे थे" आदेश पारीत केले आहेत. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

मालेगांव (जि.नाशिक) येथे गिरणा नदी पात्रातून होत असलेल्या बेकायदा वाळू उपसा

(५०) * ८१०४ डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २८१३ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील गिरणा नदी पात्रातील व अन्य ठिकाणचे गौण खनिजाचे अवैध उत्खनन वाहतूक रोखण्यासाठीच्या कारवाईअंतर्गत दोन प्रकरणात पोलीसामार्फत सुरू असलेला तपास पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, तपासात काय आढळून आहे व त्यानुषंगाने दोषी व्यक्तींविरूध्द काय कारवाई करण्यात आली,

(३) असल्यास, गिरणा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्यामुळे या भागातील हजारो हेक्टर बागायती क्षेत्र नष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) मालेगांव तालुक्यात वाळूचा मोठ्या प्रमाणावर बेकायदेशिररित्या होत असलेला उपसा थांबविणेचे दृष्टीकोणातून पोलीस व महसूल विभागाकडून कठोर कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगितले जात असले तरी, अद्यापही अवैध वाळू उपसा व त्याची सर्रास विक्री सुरू असल्याने यावर प्रतिबंध आणण्याचे दृष्टीने शासन कोणती विशेष उपाययोजना करणार आहे,

(५) अद्याप तपास पूर्ण झालेला नसल्यास, त्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) व (२) दोन प्रकरणात पोलीसामार्फत सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे. एक प्रकरणात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, दुसऱ्या प्रकरणात आरोपी न सापडल्यामुळे गुन्ह्याचे कागदपत्र ('अ' फायनल रिपोर्ट) न्यायालयात पाठविण्यात आले आहेत.

(३) मालेगाव तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी महसूल मंडळ निहाय पथके स्थापन करण्यात आली असून, वर्ष २०१४-२०१५ मध्ये गौण खनिज अवैध वाहतुक प्रकरणी ४८४ प्रकरणात रुपये ४४.७० लाख तसेच माहे एप्रिल २०१५ ते जनू २०१५ या कालावधीत ४३ प्रकरणात रुपये ७.२० लाख इतकी दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

गिरणा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याच्या कारणास्तव त्या भागातील हजारो हेक्टर बागायती क्षेत्र नष्ट होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात दंडाची रक्कम जप्त करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या बाजारमूल्याच्या पाचपट करण्याची व अवैध उत्खनन व वाहतुकीसाठी

वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व वाहने जप्त करण्याची तरतूद करण्यासाठी दिनांक १२ जून, २०१५ रोजी अध्यादेश प्रख्यापित करण्यात आला आहे.

तसेच वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी 'महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणा-या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१' मध्ये 'वाळू तस्कर' व 'वाळू तस्करी' या संज्ञांचा समावेश करण्यासाठी उक्त अधिनियमात दुरुस्त्या करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील भूस्खलनाची भिती असलेल्या गावांचा आराखडा तयार करण्याबाबत

(५१) * ९४३१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील माळीण येथील दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने पूर नियंत्रण आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समितीने घेतलेल्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील २४ गावात भूस्खलन होण्याची शक्यता असल्याने संबंधित गावांचा आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये नमूद केलेली व भूस्खलनाची भिती असलेल्या २४ गावांची नावे काय आहेत,

(४) उक्त २४ गावांच्या आराखडयामध्ये कोणकोणत्या बाबीचा समावेश करण्यात आला आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) व (२) पुणे जिल्ह्यातील भूस्खलन होण्याची शक्यता असलेल्या २३ गावांचा अहवाल भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेकडून प्राप्त झाला आहे.

(३) पुणे जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्ती होण्याची शक्यता असलेली गावे २४ नसून २३ आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १.फुलवाडे अंतर्गत भगतवाडी २.माळीण अंतर्गत पसारवाडी ३.आसाणे ४.जांभोरी अंतर्गत काळेवाडी क्र. १ व २ ५. पेंढारवाडी ६. धानवली ७.कोले (जांभवली) ८.डेहणे ९.पोगारी (सोनारवाडी) १०.निमगिरी अंतर्गत तळमाचीवाडी ११.भोमाळे १२. भोरगिरी अंतर्गत पणदरेवस्ती १३. माऊ (मोरमारवाडी व गभालेवस्ती) १४. सावळे (कडकराई) १५. लोगड १६. मालेवाडी १७. ताजे १८ बोरज १९ तुंग (भैरवनाथ मंदिर परिसर) २०. भुशी २१. घुटके २२. आंबवणे २३. घोळ.

(४) दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या २३ गावांचा गाव आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्यायावत करुन गावातील धोकादायक ठिकाणे, लोकसंख्या विषयक माहिती, निवारा, स्थानिक व शासकीय सामाजिक संस्था, आपत्ती दरम्यान संपर्क साधणाऱ्या व्यक्तींचे संपर्क क्रमांक हॉटेल, शेतीविषयक माहिती आपत्तीचा इतिहास आपत्ती प्रवण भाग दर्शविणारा नकाशा, हॉस्पीटल, उपलब्ध असलेले साहित्य इत्यादी गोष्टींचा सर्वसामावेशक आराखडा तयार करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार अद्ययावत आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे.

कोऱ्हाळे खुर्द, ता.बारामती (जि.पुणे) येथील शेतकऱ्यांचे काकडी बियाणे सदोष निघाल्याने त्याची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(५२) * ६६६० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोऱ्हाळे खुर्द, ता.बारामती, जि.पुणे येथील शेतकऱ्यांनी जे.के.सिडस या कंपनीच्या काकडी बियाण्याची लागवड केली होती. तथापि, सदर बियाणे सदोष निघाल्याने नूकसान भरपाई मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांचेकडे दि. ६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदोष बियाणे वापरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शासन स्तरावरुन काय उपाययोजना राबविण्यात येणार आहे वा येत आहे,

(४) असल्यास, सदोष बियाणे वापरून नूकसान झाल्याच्या किती तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत व त्याबाबत शासनाकडून काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे आहे.

(२) काकडी पिकास सुरुवातीस कमी फलधारणा झाली तथापि नंतर चांगली फलधारणा झाल्यामुळे संबधित शेतक-यांनी तक्रार मागे घेतलेली आहे.

(३) सदोष बियाणे वापरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तसेच फसवणूक होणार नाही यासाठी कृषि विभागांतर्गत कृषि निविष्ठांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र गुणनियंत्रण यंत्रणा कार्यरत आहे. या यंत्रणेमार्फत गुणनियंत्रणाचे सनियंत्रण केले जाते. तसेच कृषि आयुक्तालय स्तरावरील निरिक्षकाशिवाय विभागीय, उपविभागीय, जिल्हा, तालुका, पंचायत समिती या स्तरावर कृषि अधिकारी निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. बियाण्यांच्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून तक्रार प्राप्त झाल्यानंतर या समित्यांकडून नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी केली जाते. क्षेत्र पाहणीचा अहवाल संबंधीत

शेतक-यास देऊन नुकसान भरपाई मिळविण्यासाठी ग्राहक मंचात तक्रार दाखल करण्यास मदत करण्याबाबत सूचना देण्यात येते किंवा कंपनीवर बियाणे कायद्यानुसार कारवाई करण्यात येते.

(४) काकडी पिकाच्या सदोष बियाणाविषयी इतर कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बृहन्मुंबई वीज ग्राहकांवरती वीज वाढीचे संकट निर्माण झाल्याबाबत

(५३) * ६८९४ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७५४० सौर कृषिपंप बसविण्याकरिता बृहन्मुंबईतील सर्व वीज ग्राहकांवर प्रति युनिट १.०४ पैसे वीज विक्रीकराचा भार टाकण्यात आला आहे, तर अन्य शहरातील उद्योग व वाणिज्य ग्राहकांना हा वाढीव वीज विक्रीवर भरावा लागणार असल्याचे दि.१७.४.२०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईकर वीजग्राहकांवर सौरपंपाचा भार देण्याबाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील वीजग्राहकांवरील हा अन्याय दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही. अधिसूचना दिनांक २१.४.२०१५ अन्वये बृहन्मुंबईतील सर्व वीज ग्राहकांवर प्रति युनिट १.०४ पैसे वीज विक्रीकराचा भार टाकण्यात आला आहे. तर अन्य शहरांतील उद्योग व वाणिज्य ग्राहकांना हा वाढीव वीज विक्रीवर भरावा लागणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरात नाटयगृह बांधण्याबाबत

(५४) * ७४०० श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ६२० ला दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात नाटयगृह बांधण्यासंदर्भात प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, नाटयगृहाच्या बांधकामात विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर नाटयगृहाचे बांधकाम तात्काळ पुर्णात्वास नेण्याच्यादृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) ते (४) अकोला येथे नझुल शिट क्र.३९ डी, प्लॉट क्र.८२/१ व प्लॉट क्र.८२/२ मधील जागा शासनाच्या विकास योजनेनुसार नाट्यगृह व वाणिज्यिक संकुल आणि वाहनतळ यासाठी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून सदर क्षेत्रासाठी आकारावयाच्या मुल्यांकनविषयी तसेच काही इतर बाबीविषयी जिल्हाधिकारी, अकोला यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या दृष्टीने प्रस्तावाची छाननी शासन स्तरावर सुरू आहे.

राज्यातील बेकायदा रेती उत्खन्न रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही

(५५) * ६९२६ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात झपाट्याने नागरिकाकरण होत आहे वाढत्या बांधकांमाना वाळूची गरज असते त्यामुळे मोठ्याप्रमाणात ठाणे व कल्याण खाडीमध्ये बेकायदा वाळू उपसा होत असल्याचे माहे मे-२०१५ च्यासुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हयांमध्ये वाढत असलेल्या नागरिकीकरणामुळे वाढत्या बांधकामांना वाळूची गरज असते त्यामुळे मोठ्या प्रमाणात विविध खाडी व नद्यांमध्ये बेकायदा वाळू उपसा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात रेतीचा बेसुमार उपसा होऊ लागल्याने नद्यांचे, खाड्यांचे पात्र अरुंद होत आहे तसेच मत्स्यव्यवसायावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बेकायदा रेती उत्खन्न रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) कल्याण खाडीमध्ये बेकायदा वाळू उपसा होत असल्याची प्रकरणे माहे एप्रिल-मे, २०१५ च्या सुमारास दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

(२) राज्यातील इतर भागातही गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतूकीची प्रकरणे दृष्टोत्पीस आली आहेत.

(३) अशी बाब आढळून आली आहे.

(४) राज्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आलेली आहेत.

याशिवाय महाराष्ट्र जमीन महसूल संहीता, १९६६ मधील कलम ४८(७) व (८) मध्ये गौण ख्रनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणात दंडाची रक्कम जप्त करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या बाजारमूल्याच्या पाचपट करण्याची व अवैध उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व वाहने जप्त करण्याची तरतूद करण्यासाठी दि. १२ जून, २०१५ रोजी अध्यादेश प्रख्यापित करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, ओषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तीं (व्हिडीओ पायरेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१" मध्ये "वाळू तस्कर" व "वाळू तस्करी" या संज्ञांचा समावेश करण्यासाठी उक्त अधिनियमात दुरुस्त्या करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महानिर्मितीचे प्रकल्प उभारण्यासाठी सरासरीपेक्षा जास्त खर्च केला जात असल्याबाबत

(५६) * ९३४६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मितीचे प्रकल्प उभारण्यासाठी सरासरीपेक्षा जास्त खर्च केला जात असल्याने महानिर्मितीच्या या महाखर्चामुळे भुसावळ येथील दोन वीज प्रकल्पाच्या वीजेसाठी प्रती युनीट ५ रुपये ५२ पैसे म्हणजे तब्बल दुप्पट दर प्रस्तावित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानिर्मितीच्या या अनियंत्रित कारभारात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

महानिर्मिती कंपनीच्या भुसावळ येथील प्रकल्पाच्या किंमतीतील वाढ ही मुख्य व उर्वरीत संयंत्र कंत्राटदारांकडून यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्यात झालेला विलंब, अपु-या कोळसा पुरवठ्यामुळे संच वाणिज्यिक स्वरुपात चालू करण्यास झालेला उशीर, ज्यामुळे बांधकाम काळातील खर्चावरील व्याजाच्या रक्कमेत झालेली वाढ, यामुळे झाली आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने या सर्व कारणांचा साकल्याने विचार करून, भुसावळ संच क्र.४ व ५ करीता रुपये ४.५३ प्रति युनिट इतका वीज दर मंजूर केला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(५७) * ७४१७ श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक ५७०४ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.पशुसंवर्धन मंत्री यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ३०० पात्र उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरू आहे.

गट-क संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. गट-ड संवर्गातील पदे भरण्याबाबत दिनांक ४.६.२०१५ रोजी वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यांत्रिक बोटींना मेकॅनिक दाखल्याशिवाय मच्छिमारी करण्यास परवानगी नसल्याबाबत

(५८) * ६७१२ श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यांत्रिकी मच्छिमार नौकाधारकास मॅकेनिकच्या दाखल्याशिवाय मच्छिमार करण्यास प्रतिबंध करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्याय, रायगड जिल्ह्यात बोटीवरील मशिनची पाहणी करुन मेकॅनिक दाखला देण्याची व्यवस्था नसल्याने मस्त्य व्यावसायिक मच्छिमार करीत नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हयात बोटीवरील मशिनची पहाणी करुन मेकॅनिक दाखला मच्छिमारी करणाऱ्यांना देण्याची व्यवस्था करणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे नाही, ६ सिलींडर नौकांसाठी मॅकेनिकचे प्रमाणपत्र घेण्याचे निर्देश आहेत. तथापि मासेमारीसाठी प्रतिबंध करण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) रायगड जिल्ह्यातील ३ मॅकेनिक्सना ताप्तुरती व्यवस्था म्हणून प्रमाणपत्र देण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात एस.टी.प्रवासी संख्येत दिवसेंदिवस होणारी घट, बंद पडलेल्या एस.टी.गाडयांची वाढती संख्या व सोयी-सुविधांच्या कमतरतेबाबत

(५९) * ७१९१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी.बसेसच्या पुर्नबांधणीचे रखडलेले वेळापत्रक, गाड्यांची देखभाल, सोयी-सुविधांची कमतरता, नवीन गाड्यांचा वेळेत न होणारा समावेश, प्रवासी संख्येत दिवसेंदिवस होणारी घट, बंद पडलेल्या एस.टी. गाड्यांची संख्या अशा बिकट अवस्थेने एसटीची अवस्था दयनीय झाली असून राज्य परिवहन मंडळाला दोन हजार कोटींचा तोटा झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवस्थेतून एस.टी. बसेसला बाहेर काढण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे अंशत: खरे आहे.

महामंडळाचा संचित तोटा रु. २००५ कोटी एवढा झाला आहे.

(२) एस.टी. बसेसची बांधणी व पुर्नबांधणी वेळापत्रकानुसार होते. वाहनांची प्रतिबंधात्मक देखभाल नियमितपणे करण्यात येते. २०१५-१६ या वर्षात एकूण १७९२ नवीन गाडया चालनात आणण्याचे नियोजन केले आहे व त्यानुसार मध्यवर्ती कार्यशाळेमध्ये बसेस बांधणी करुन चालनात आणण्यात येत आहेत. प्रवाशांच्या आरामदायी सोयीसाठी नविन वातानुकूलित शिवनेरी बसेसची खरेदी करण्यात येत आहे. बसेस मार्गस्थ बिघाडाचे प्रमाण कमी करण्याकरीता विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

महामंडळाच्या तोटयासंदर्भातील बाब खरी असून महामंडळाचे भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने सुचना प्रसारित करण्यात आलेल्या असून प्रवासी संख्येत वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना राबविण्यात येत असून अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यत प्रवास भाडयात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोगस परवानाधारक रिक्षा चालकांवर कठोर कारवाई करण्याबाबत

(६०) * ६८४९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यात धावत्या रिक्षामधून तरुणीने उडी टाकल्याची घटना घडल्याने रिक्षाचालकांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून मुंबईत एकूण ८० हजार परवाने कार्यरत असून एकूण रिक्षा परवान्यांची संख्या एक लाखांहून अधिक आहे व त्यातील सुमारे २० हजार रिक्षा परवाने कागदपत्रीय त्रुटीमुळे प्रलंबित आहेत. तसेच मुंबईत अडीच हजार रिक्षा परवाने बोगस रिक्षा ठराविक टप्प्यांवरच धावत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) बोगस रिक्षासंदर्भात कठोर कारवाई करण्यात यावी अशा आशयांच्या मागणीचे एक लेखी निवेदन श्री.रामराव मोकाशी यांनी मा.मुख्यमंत्री, परिवहन आयुक्त यांना माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणीनुषंगाने शासनाने कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) मुंबईत कार्यरत असलेल्या बोगस रिक्षा विरोधात परिणामकारकरीत्या आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे ?

श्री. दिवाकर रावते : (१) ठाण्यातून भिवंडी येथे ऑटोरिक्षाने जाताना चालकाच्या गैरवर्तणूकीमुळे दोन तरुणींनी धावत्या रिक्षातून उडी घेतल्याने जखमी झाल्याची घटना दि. २ मार्च, २०१५ रोजी घडली.

मुंबई शहरात आजमितीस एकूण १,२९,५४३ ऑटोरिक्षा परवाने आहेत. त्यातील ४१,८६१ परवाने रद्द/व्यपगत असून वैध परवान्यांची संख्या ८७,६८२ इतकी आहे. कागदपत्राच्या त्रुटीमुळे परवाने प्रलंबित नाहीत.

मुंबई शहरात बोगस रिक्षा चालत असल्याबाबतची निवेदने ऑटोरिक्षा संघटनांकडून प्राप्त झाली आहेत.

(२) असे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) बोगस ऑटोरिक्षांवर वायुवेग पथकांद्वारे मुंबई व ठाणे शहरांत वेळोवेळी कारवाई करण्यात येते

दि. ०१.०६.२०१५ ते १२.०६.२०१५ या कालावधीत मुंबई व मुंबई उपनगरात अवैध ऑटोरिक्षांविरोधात विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान दोषी आढळलेल्या ३७६० वाहनांवर आवश्यकतेप्रमाणे दंड वसूली, वाहन जप्ती, नोंदणी निलंबन अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात आली.

तसेच दि. १५.०६.२०१५ ते २०.०६.२०१५ या कालावधीत ठाणे/पनवेल विभागात अवैध ऑटोरिक्षांविरोधात विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान दोषी आढळलेल्या १६८ वाहनांवर आवश्यकतेप्रमाणे दंड वसूली, वाहन जप्ती, नोंदणी निलंबन व अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात आली.

(४) बोगस ऑटोरिक्षांना परिणामकारकरित्या आळा घालण्यासासाठी वायुवेग पथकांद्वारे नियमीत तपासणी करण्यात येते, विशेष तपासणी मोहिमेचे आयोजन केले जाते, बोगस रिक्षा आढळून आल्यास जप्त करुन सदर रिक्षा स्क्रॅप केल्या जाता. ऑटोरिक्षामध्ये परवान्याची रंगीत झेरॉक्स प्रत लॅमीनेट करुन प्रवाशांना दिसेल अशा ठिकाणी लावण्याची कार्यवाही केली जाते. तसेच प्रवाशांना तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांकाची सुविधा देण्यात आली आहे.

खामगांव (जि.बुलढाणा) येथे महाराणा केबल नेटवर्कचे अवैध कनेक्शन बंद करण्याबाबत

(६१) * **८१४८ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव परिसरात महाराणा केबल नेटवर्कचे प्रचंड जाळे पसरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक केबल कनेक्शन जास्त असून सुध्दा शासनाकडे कमी कनेक्शन दाखवून शासनाची मनोरंजन कर भरण्यामध्ये फसवणूक करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत उपविभागीय अधिकारी, खामगांव यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(५) असल्यास, शासनाची फसवणूक करणाऱ्या वा कर बुडविणाऱ्या महाराणा केबल नेटवर्कच्या संचालकांवर व कर बुडविणाऱ्या संचालकांना पाठीशी घालणाऱ्या उपविभागीय अधिकारी, खामगांव यांचेवर कडक कारवाई करणार आहात काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, खामगाव येथे शहरी व ग्रामीण भागात महाराणा केबल नेटवर्कद्वारे अनेक केबल जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) होय.

जिल्हाधिकारी बुलढाणा यांना प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी खामगाव यांना महाराणा केबल नेटवर्क यांनी दिलेल्या केबल जोडण्याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने महाराणा केबल नेटवर्क कंपनीचे विशेष पथकांद्वारे सर्वेक्षण करण्यात आले.

सर्वेक्षणामध्ये शहरी भागात सर्वेक्षणापूर्वी दाखविण्यात आलेल्या ४,३०४ इतक्या केबल जोडण्यांची संख्येमध्ये १,५५० केबल जोडण्यांची तसेच ग्रामीण भागामध्ये सर्वेक्षणापूर्वी दर्शविण्यात आलेल्या १,६२६ केबल जोडण्यांमध्ये ३,२३५ जोडण्यांची वाढ आढळून आली आहे.

(५) सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या वाढीव केबल जोडण्यापोटी अनुज्ञेय करमणूक शुल्क वसुलीबाबत संबंधितांना नोटीसेस देण्यात आल्या असून अनुज्ञेय करमणूक शुल्क वसुलीची कार्यवाही सुरु असल्याने केबल नेटवर्कच्या संचालकांना पाठीशी घालण्यात आल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, खामगांव यांचेवर कार्यवाहीची आवश्यकता वाटत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कामगारांना नियमानुसार पगार न देणाऱ्या खाजगी ठेकेदारांवर कारवाई करणेबाबत

(६२) * ९५७७ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या काही वर्षाच्या कालावधीत महावितरण, इतर कंपन्यांचा कामाचा व्याप वाढल्यामुळे खासगी ठेकेदारांना ठेके देऊन कामगारांचे पगारही निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदारांनी कामगारांना किती पगार द्यावा याबाबत नियम तयार करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांना दिवसाला ३९९ रुपये पगार देणे बंधनकारक असताना हे ठेकेदार मात्र त्यांना ३४४ रुपये पगार देत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नियमानुसार ठेकेदार कामगारांना वेतन देत आहेत किंवा नाही याची शहानिशा शासन करित आहे काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच कामगारांना नियमानुसार पगार न देणाऱ्या ठेकेदारांची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास दोषी आढळून आलेल्या ठेकेदारांवर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) नाही.

मात्र कंत्राटादारामार्फत नियुक्त कामगारांना किमान वेतन दिले जात असल्याची खात्री करण्यात येते.

(२) नाही

(३) नाही.

(४) कंत्राटदारामार्फत नियुक्त कामगारांना किमान वेतन दिले जात असल्याची खात्री करण्यात येते

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

तेल संशोधन सर्व्हेमुळे वसई नजिकच्या किनारपट्टीवर ५ महिन्यापासून मासेमारी बंद असल्याबाबत

(६३) * ६९९४ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल आणि नैसर्गिक वायु महामंडळाने खोल समुद्रात मासेमारी क्षेत्रात सुरू केलेल्या तेल संशोधन सर्व्हेमुळे वसई नजिकच्या किनारपट्टीवरील तब्बल ५ महिन्यापासून मासेमारी बंद असल्याने मच्छिमारांना त्यांचा मोठा फटका बसला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने वसई तहसिलदार कार्यालयावर दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छिमारांना होणारा आर्थिक तोटा लक्षात घेता त्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

तथापि पाच महिन्यापासून मासेमारी बंद असल्याची बाब खरी नाही.

(३) सर्व्हे दरम्यान जाळ्याचे नुकसान झाल्याबाबतच्या तक्रारी मच्छिमारांकडून शासनास प्राप्त झाल्यानुसार भरपाई मिळण्याबाबत ओएनजीसीला शिफारस करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील गणेशपेठ बस स्थानकावर शौचालय व अपुरे शेड फॉर्मच्या दुरूस्तीबाबत

(६४) * ७३३५ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर स्थित गणेशपेठ बस स्थानकाची स्थिती अतिशय खराब झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाद्वारे बसस्थानक दुरुस्ती करिता काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, बस स्थानकावर शौचालय व अपुरे शेड प्लॅट फॉर्म बाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, सदर दुरूस्तीचा प्रस्ताव प्रलंबीत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे नाही.

(२) बसस्थानक इमारत सुस्थितीत असून डिसेंबर, २०१४ मध्ये बसस्थानकाची रंगरंगोटी केली आहे.

(३) बसस्थानकात पुरूष व महिला प्रवाशांकरीता शौचालय व मुता-यांची पुरेशी सुविधा आहे. सध्या गणेशपेठ बसस्थानक येथे २० फलाट तसेच गणेशपेठ ग्रामिण बसस्थानक येथे ५ फलाट अशा एकूण २५ फलाटांवरुन वाहतुक करण्यात येत आहे. गणेशपेठ येथे जागा अपुरी असल्यामुळे बसस्थानक विस्तारित करण्याकरिता तात्पुरते प्रवासी निवारे बांधण्याबाबत काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकामध्ये खाद्यपदार्थांची विक्री जास्त दराने होत असल्याबाबत

(६५) * ७०१९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाचे पंढरपुर हे मोठे बसस्थानक असून या बस स्थानकावर दररोज शेकडो बसेस राज्यातून ये-जा करीत असून २० हजार प्रवाशी दररोज ये-जा करीत असतात या बसस्थानकात असलेल्या दुकान गाळ्यांतून मोठ्या प्रमाणात ग्राहकांची लूट होत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नवीन बसस्थानकामध्ये असलेल्या उपहारगृहामधून विविध खाद्यपदार्थाची विक्री प्रमाणित किंमतीपेक्षा जास्त दराने केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या विक्रीमधून प्रवाशांना लुबाडण्यात येत असुन शीतपेये, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, आईस्क्रीम, बेकरीचे पदार्थांच्या प्रमाणित किंमतीमध्ये खाडाखोड करुन वाढीव दराने अथवा कुलिंग चार्जेस या नावाने विक्री सुरू आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, यामुळे ग्राहकांचे नुकसान होत असून अन्न भेसळ तसेच वजन मापे यांच्याकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे नाही.

पंढरपूर येथे राज्य परिवहन महामंडळाने व्यापारी संकुल योजनेच्या माध्यमातून सन २००९ मध्ये १८ फ्लाटांचे बसस्थानक बांधलेले आहे. या ठिकाणी दैनंदिन ८१६-८१६ बसेसची आगमने-निर्गमने होतात.

उपहारगृहातील विविध खाद्यपदार्थांची विक्री प्रमाणित किंमतीपेक्षा जास्त दराने होत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) विकास करारातील तरतूदीनूसार विकासकाने उपहारगृह व विविध खाद्य पदार्थ विक्रीसाठी ३१ दुकान गाळयांचे पणन केलेले असून महामंडळामार्फत गाळेधारकांशी भाडे करार करण्यात आलेले आहेत. भाडे करारातील तरतूदीनुसार भाडे धारकांना दुकाने प्रस्थापनांतर्गत (शॉप ॲड एस्टाब्लीशमेंट ॲक्ट) मधील नियम व बंधने तसेच शासनाचे अधिनियम लागू होतात. गाळेधारकांनी त्याचे उल्लंघन केल्यास शासनाच्या संबंधित विभागाकडून कारवाईस पात्र ठरतात.

(४) तथापि, सदर प्रश्नांच्या अनुषंगाने याबाबत संदर्भाधिन आगार व्यवस्थापक, पंढरपूर व विभाग नियंत्रक, सोलापूर यांनी सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन सोलापूर व मुख्याधिकारी, नगर परिषद, पंढरपूर तसेच वजनमाप निरिक्षक पंढरपूर विभाग यांचेकडे आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत पत्र दिने आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

बीड येथे औरंगाबाद, पुणे आणि मुंबई करीता
अतिजलद व शिवनेरी बस सुरू करणेबाबत

(६६) * ७४९५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड बसस्थानकातून औरंगाबाद, पुणे आणि मुंबई करीता अतिजलद व शिवनेरी बस सुरु करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी प्रवासी वाहतुकीला प्रोत्साहन मिळावे म्हणून महामंडळाने बीड येथून जाणा-या अनेक लांब पल्ल्याच्या बस बंद केल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी प्रवासी वाहतुकीला आळा बसण्यासाठी आणि प्रवाशांचे हित लक्षात घेवून पुणे आणि मुंबई येथे अतिजलद (दोन थांबे) बसगाड्या सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) असल्यास, बीड बसस्थानकातून मुंबई येथे रात्रीच्यावेळी प्रवास करण्याकरीता निमआराम आणि अतिजलद गाड्या सुरू करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. दिवाकर रावते : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गेवराई येथून १९.३० वा. व बीड बसस्थानकातून २०.३० वाजता सुटणारी गेवराई-बीड-मुंबई या सेवेचे भारमान अत्यल्प येत असल्यामुळे सदर फेरीचा मार्ग बदलून ती फेरी गेवराई-शेवगांव-अहमदनगर-मुंबई अशी चालनात आहे. याशिवाय बीड स्थानकातून सुटणारी कोणतीही लांब पल्ला सेवा बंद केलेली नाही.

(३) बीड येथील खाजगी प्रवासी वाहतूकीला आळा बसावा व अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक परिवहन विभाग वाहतूक पोलीस यांचे पर्यवेक्षक यांच्या संयुक्त पथकाद्वारे दैनंदिन अवैध प्रवासी वाहतूक मोहिम राबविण्यात येते. तसेच बीड येथून पुणे आणि मुंबईकरिता (दोन थांबे) बसगाड्या सुरू करणेबाबत चालनीय पडताळणी करण्यात येत आहे.

(४) बीड बसस्थानकातून १८.०० वाजता सुटणारी बीड-मुंबई व १९.०० वाजता सुटणारी माजलगाव-मुंबई या फे-या निमआराम (पुशबॅक आसनव्यवस्था) चालविणे ही बाब महामंडळाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत रिक्षा आणि टॅक्सीसाठी हकीम समिती रद्द करून नवीन समिती नेमण्याबाबत

(६७) * ७६६७ श्री.कपिल पाटील, ॲड.अनिल परब, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत रिक्षा आणि टॅक्सीच्या भाडेवाढीची शिफारस करतांना हकीम समितीने चुकीचे निकष गृहीत धरल्यामुळे प्रवाशांवर गेल्या तीन वर्षात ५० टक्के भाडेवाडीचा भुर्दड पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकष वेळीच तपासले असते तर चार व पाच रुपयांनी भाडे कमी झाले असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हकीम समिती बरखास्त करुन रिक्षा टॅक्सीची भाडे सुधारणा करण्यासाठी माजी न्यायमुर्तीच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येणार आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) मागील ३ वर्षामध्ये निश्चित केलेले भाडेदर आणि प्रत्यक्षातली भाववाढ यांचा तुलनात्मक विचार करुन व हक्कीम समितीच्या शिफारशींवर पुनर्विचार करुन बदललेल्या परिस्थितीनुरुप भाडेदारांबाबत सुधारित शिफारशी करण्याकरिता मा. उच्च न्यायालयाचे माजी न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सायखेडा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) प्रकल्पा अंतर्गत
बाधित शेतकऱ्यांना जमिनीचे पट्टे देण्याबाबत

(६८) * ७६२० श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायखेडा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) प्रकल्पा अंतर्गत वागदा गावातील शेतकऱ्यांची जमिन धरणात गेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प १९६७-६८ मध्ये करण्यात आले असून बाधित शेतकऱ्यांना मोबदल्यात मोफत जमीन उमरी व पाथरी या गावांना देण्यात आली. परंतु सदर जमिनीचे पट्टे अजूनही शेतकऱ्यास देण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील सातबारावर सरकार अशी नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाधित शेतकऱ्यांना शासन पट्टे देणार आहे काय, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

मौजे वागदा येथील ८ प्रकल्प ग्रस्तांना मौजे, उमरी येथील सरकारी जमिनीचे वाटप १९६८ मध्ये मंजूर करण्यात आले व त्यांना पट्टे देण्यात आले. महसुली दफ्तरी त्याची नोंद करण्यात आली व पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत प्रकल्पाग्रस्तांना मंजूर करण्यात आलेल्या जमीनीचे रुपांतर भोगवटदार वर्ग-२ मधून भोगपटादार वर्ग-१ मध्ये मार्च २०१० मध्ये करण्यात आले आहे.

सायखेडा प्रकल्पाअंतर्गत वागदा गावातील शेतकऱ्यांना पाथरी येथे जमीनीचे वाटप करण्यात आल्याची नोंद मौजे पाथरी या गावाच्या मूळ सातबारा (अभिलेखाचे) तपासणी करण्यात आली असता आढळून येत नाही.

(३) होय, मौजे उमरी येथील गट क्र. ८५,९५ ची वहिती काही प्रकल्पग्रस्त करीत असून मौजे उमरी येथील भाव नमुना सात बारावर सरकार सी क्लास अशी नोंद आहे.

(४) अभिलेखाची पडताळणी करुन प्रचलीत धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

नवेगाव (जि.भंडारा) येथील शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळण्याबाबत

(६९) * ८२३८ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगाव (जि.भंडारा) येथील शेतकऱ्यांना विद्युत पंपाला वीज जोडणी मिळावी याकरिता गेल्या दोन वर्षात किती शेतकऱ्यांनी स्थानिक कार्यालय नवेगाव येथे अर्ज केले आहेत,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी वीज जोडणीकरिता पैसे भरुनही अद्याप वीज जोडणी देण्यांत आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना तात्काळ वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) भंडारा जिल्ह्यामध्ये नवेगांव हे गाव, पवनी तालुक्यातील कोसरा वितरण केंद्र, तुमसर तालुक्यातील सिहोरा वितरण केंद्र व मोहाडी तालुक्यातील करडी वितरण केंद्र अंतर्गत येत असून मागील २ वर्षात एकूण १७ कृषीपंपाना विद्युत पुरवठ्याकरिता अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(२) होय, भंडारा जिल्ह्यामध्ये नवेगांव हे गांव पवनी तालुक्यातील कोसरा वितरण केंद्र, तुमसर तालुक्यातील कोसरा वितरण केंद्र, तुमसर तालुक्यातील सिहोरा वितरण केंद्र व मोहाडी तालुक्यातील करडी वितरण केंद्र अंतर्गत येत असून, मे २०१५ अखेर एकूण ९ अर्जदारांनी पैसे भरले असून, वर्ष २०१३-२०१४ मधील ३ व २०१४-२०१५ मधील ६ अर्ज प्रलंबित आहेत.

(३) भंडारा जिल्ह्यामध्ये मार्च-२०१५ अखेर प्रलंबित कृषीपंपाना विद्युत पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कामाचे आदेश देण्यात आले आहेत व लवकरच लाभार्थ्यांना विद्युत पुरवठा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाळू माफियांकडून वसईतील तहसिलदार व कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याबाबत

(७०) * १०१०९ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईचे तहसिलदार व कर्मचारी यांनी अवैध वाळू उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या ट्रकवर दिनांक ५ जून, २०१५ रोजी वा त्यादरम्यान भामट पद येथे कारवाई केल्यामुळे वाळू माफियांनी तहसिलदार व कर्मचाऱ्यांना मारहाण केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) तहसिलदार वसई व त्यांचे पथक दिनांक ०४/०६/२०१५ रोजी अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रक पोलीस चौकीमध्ये घेऊन जात असताना, भामट पाडा येथे काही व्यक्तींनी तहसिलदार व त्यांच्या पथकास घेराव घालून शिवीगाळ केली व अवैध वाहतूक करणारा ट्रक बळजबरीने पाळवून नेला, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी विरार पालीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गावांना मुसळधार पाऊस व वादळामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत

(७१) * ७११३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ७० गावांना वादळासह, मुसळधार पावसांचा तडाखा बसल्याने हसोळ मुसलमान वाडीतील महिलेचा जागीच मृत्यू झाला असुन घरातील अन्य दोन मुले गंभीर जखमी झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तुफान वादळात सुमारे दीड हजाराच्या आसपास घरांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१), (२) व (३) होय.

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात दिनांक २७.४.२०१५ रोजीच्या वादळाने मौजे हसोळ तर्फ येथील श्रीमती रुकसाना सुलेमान मीर यांच्या घरावर वडाचे झाड कोसळून सदर महिला मृत झाली असून तिच्या घरात असलेली तीन लहान मुले जखमी झालेली आहेत. मृत व्यक्तीच्या वारसास व जखमींना निकषानुसार अनुदान वाटप करण्यात येत आहे. तसेच ज्या गावांना वादळी वा-याचा तडाखा बसला आहे, तसेच अवकाळी पाऊस व वादळी वा-यामुळे घरांचे व इतर नुकसान झालेले आहे, अशा पात्र आपदग्रस्तांना अनुदान वाटप करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य विजवितरण कंपनीने सन २०१५-१६ या कालावधीत विज दर वाढविण्याच्या प्रस्तावाबाबत

(७२) * ९३२५ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विजवितरण कंपनीने सन २०१५-१६ या कालावधीसाठी वीज दर वाढ करणेसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास प्रस्ताव दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दर वाढीमुळे सर्वसाधारण जनता, रुग्णालय व शिक्षण संस्था यांना अधिकचा आर्थिक बोजा सहन करावा लागणार असल्याने उद्योजक व व्यापारी वर्गामध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन विज दर वाढ रोखणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) अंशतः खरे आहे. महावितरण कंपनीने महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडे बहुवार्षिक वीजदर याचिका दिनांक ३.२.२०१५ रोजी सादर केली.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औष्णीक विघुत केद्रांमधुन निघणाऱ्या राखेतील पाऱ्याचा अंश रोखण्याबाबत

(७३) * ७२८५ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २७०६ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रामधुन निघणाऱ्या राखेमध्ये पाऱ्याचा अंश असतो जो पाण्यासोबत जमीनीमध्ये मुरला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा पाऱ्याचा अंश जमीनीमध्ये मुरु नये या करीता केंद्रीय हरीत लवादयाने राखेच्या बंधाऱ्याखाली (high density poly ethelin sheet linkng) चा वापर करण्याकरिता महाजनकोला आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या राखेच्या विल्हेवाटा करीता (dry bottam ash removal system) चा वापर बंधनकारक करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, पर्यायी उपाय कोणते ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) राखेमध्ये पाऱ्याचा अंश नगण्य स्वरुपाचा असतो, त्यामुळे हे म्हणणे खरे नाही.

(२) नाही.

(३) बॉटम ॲश ही ओल्या स्वरुपात गोळा होते त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मच्छिमारांना डिझेल परताव्याची रक्कम तात्काळ देण्याबाबत

(७४) * ७६४५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मच्छिमारांना मासेमारी व्यवसायातून रोजगार निर्मिती तसेच देशाला परकीय चलन मिळत असल्याने मासेमारी व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी मासेमारी साहित्यांमध्ये सवलत तसेच मच्छिमार नौकांना सोसायट्यांच्या माध्यमातून सवलतीत डिझेल पुरविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार नौकांसाठी कलरकोडचा निर्णय शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छिमार नौकांसाठी “गुलाबी रंग” निश्चित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने माहे मार्च, २०१५ अखेर जिल्हयातील डिझेल कोट्यातील १७२९ बोटींपैकी १०४० बोटींचे म्हणजेच ६०.१५ टक्के बोटींचे कलरकोडचे काम पूर्ण करण्यात आले होते, पण जोपर्यंत सर्व मच्छिमार कलरकोडचे काम पूर्ण करत नाहीत तोवर डिझेल परतावा मिळणार नाही असा निर्णय मत्स्य विभागाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोकण आणि मुंबई उपनगर जिल्हयातील मच्छिमारांना गेल्या १३ महिन्यांपासून मासेमारी नौकांच्या डिझेल खरेदीवर शासनाकडून दिल्या जाणाऱ्या डिझेल परताव्याची सुमारे १०० कोटी इतकी रक्कम मिळाली नसल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) सदर नौका डिझेल परताव्याची थकीत सर्व रक्कम मिळावी म्हणून कोकण प्रदेशातील मच्छिमारांनी अनेकदा आंदोलने केली असून करंजा मच्छिमार संघटनेचे चेअरमन श्री.प्रदीप नाखवा यांनी देखील दिनांक १४ मे, २०१५ वा त्यासुमारास त्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच प्रधान सचिव, गृह (बंदरे) विभाग, मंत्रालय यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर निवेदनाधिन बाबींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(८) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) हे अंशत: खरे आहे. तथापि कलरकोडींगच्या कारणास्तव डिझेल परताव्याची सुमारे १०० कोटी रक्कम मिळाली नसल्याची बाब खरी नाही.

(६) नाही.

(७) विभागास उपलब्ध तरतूदीनुसार जिल्हयातील मच्छिमारांना डिझेल प्रतिपूर्ती रक्कम अदा करण्यात आली आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील चांदोली अभयारण्यात व धरणग्रस्तांच्या मागण्याबाबत

(७५) * ९०६६ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील चांदोली अभयारण्यात व धरणग्रस्तांनी नुकसान भरपाईच्या रकमेबरोबरच जमिनी मिळाव्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे एप्रिल, २०१५ दरम्यान आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणग्रस्तांच्या व चांदोली अभयारण्य या प्रकल्पाग्रस्तांच्या मागण्यावर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे खरे आहे.

(२) I) चांदोली अभयारण्यामुळे बाधीत ७ गावांतील ८२१ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कोल्हापूर जिल्ह्यातील १३ वसाहतीत करण्यात आले आहे. त्यापैकी २६८ प्रकल्पग्रस्तांना ९६ हे. ६६ आर पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ५५३ प्रकल्पग्रस्तांना वाटपासाठी ५६६ हे. १६ आर क्षेत्राची आवश्यकता असून त्यापैकी २४२ हे. वन जमिनीच्या निर्वणीकरणाच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. तसेच त्याव्यतीरिक्त आवश्यक पर्यायी जमीन मुलकीपड व गायरान जमीनीतुन उपलब्ध करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

II) वारणा प्रकल्पामुळे बाधीत ६७३ प्रकल्पाग्रस्तांपैकी ५८४ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले असुन उर्वरित ८९ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटपासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

III) आंदोलक प्रकल्पग्रस्तांनी निवेदानादवारे सादर केलेल्या एकूण १६ मागण्यापैकी ७ मागण्यांची पुर्तता करण्यात आली असुन इतर ७ मागण्यांवर कार्यवाही करण्यात येत आहे तसेच २ मागण्या निश्चीत स्वरुपाच्या नसल्याने त्यावर कार्यवाही करता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषि विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करुन घेण्याबाबत

(७६) * **१००२९ श्री.विजय सावंत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठात कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना विद्यापिठात कायम करुन घेण्याबाबत विद्यापीठाकडे सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोकण कृषी विद्यापीठात काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना हजेरी पट लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, तदनुषंगित कंत्राटी पध्दतीच्या कामगारांना कायम करुन घेण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.
(२) विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार कामाचे स्वरुप पाहून दरपत्रके मागवून ठेकेदारांना कामाचे कंत्राट देण्यात येते. कंत्राटानुसार काम करणारे कामगार हे ठेकेदाराचे असल्याने विद्यापीठाने कंत्राटी कामगारांचे हजेरी पट ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) कंत्राटदारांमार्फत काम करवून घेताना कामावरील कामगार हे ठेकेदाराचे असल्याने, या कामगारांना कायम करुन घेण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला नाही.
(४) निरंक.

सातपाटी (जि.पालघर) येथील मासळी लिलावगृहाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

(७७) * ९६१७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपाटी (जि.पालघर) येथे दिड कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात येणाऱ्या मासळी लिलावगृहाचे बांधकाम सन २०१२ रोजी सुरु होऊनही अद्यापी पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मासळी लिलावगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने मासळीचा लिलाव उघड्यावरच होत असल्याने सातपाटी परिसरात दुर्गंधी व साथीच्या रोगाची लागण नागरिकांना होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मासळी लिलावगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, मासळी लिलावगृहाचे काम पूर्ण न होण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.
(२) नाही. सद्यस्थितीत सातपाटी येथे मासळीचा लिलाव प्रचलित ठिकाणी सालाबाद प्रमाणे होत आहे.
(३) होय.
(४) व (५) स्थानिक मच्छिमार संस्थांच्या प्रतिनिधीनी लिलावगृहाच्या बांधकामांसाठी विरोध दर्शविल्याने बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही.

राज्यातील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत देण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

(७८) * ६६५९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत देण्यासाठी शासनाकडून चालु वर्षी अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील शासकिय कृषी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ई.बी.सी. ची सवलत देण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशन माहे मार्च, २०१५ मध्ये मा.कृषी मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, खाजगी संस्थेच्या कृषी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मिळणारी ई.बी.सी. सन २०१४-१५ ची रक्कम अद्याप दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, ई.सी.बी. लाभार्थींना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती करीता शासनाकडून पुरेसे अनुदान उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना नियमितपणे ई.बी.सी. देण्यासाठी आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यामध्ये विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, एकूण किती विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत देण्यात येत आहे वा देण्याचे प्रस्तावित आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे नाही.

राज्यातील खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी. शिष्ववृत्ती देण्यासाठी चालू वर्षी रु. ८ कोटी इतके अनुदान मंजूर झाले आहे. त्यापैकी १ कोटी ३३ लाख ३३ हजार इतके अनुदान महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडे वितरीत करण्यात आले आहे.

(२) राज्यातील खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयामधील शासकीय कोटयातील प्रवेशित आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाच ई.बी.सी. शिष्यवृत्ती देय आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०१४-१५ मध्ये ई.बी.सी. शिष्यवृत्तीकरीता रु. ६ कोटी ८० लाख इतकी रक्कम दिनांक ३० मार्च, २०१५ च्या अखेरपर्यंत वितरीत करण्यात आली आहे.

(४) व (५) सन २०११-१२ पासून ई.बी.सी. शिष्यवृत्तीकरीता आवश्यक देय अनुदानापेक्षा कमी अनूदान मंजूर झाल्यामुळे विद्यार्थ्यांना देय अनुदान उपलब्ध झालेले नाही, त्याकरीता उर्वरित देय रकमेची मागणी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या वर्षात एकूण ३३,६१६ विद्यार्थ्यांना ई.बी.सी. शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

शासनाने वीज वितरण, वीतगळती रोखणे आणि वीज बीले वसूल करण्याबाबत

(७९) * ६८९५ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.महादेव जानकर, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने वीज वितरण, वीजगळती रोखणे आणि वीज देयके वसूल करण्याबाबत नागपूरसाठी एनएसडीएल, भिवंडीसाठी टोरंटो पॉवर तर औरंगाबादसाठी जीटीएल या खाजगी कंपन्यांनी नियुक्ती केली होती मात्र या कंपन्यांनी मोठया प्रमाणात घोटाळे केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज फ्रॅन्वायझी कंपन्यांनी केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळयांच्या चौकशीबाबत सत्यशोधन समितीची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीने सदर कंपन्यांच्या घोटाळाची चौकशी करून अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपन्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सत्यशोधक समितीच्या चौकशीचे काम चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रक्तपेढीला सवलतीने विज पुरवठा करणे बाबत

(८०) * ७४०६ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील रक्तपेढीला सवलतीच्या दराने विद्युत पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यंत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर आदेश दिनांक १६.८.२०१२ पासून रक्तपेढीला "सार्वजनिक सेवा" या मधील वर्गवारीनुसार दर आकारण्यात येत असून हा दर वाणिज्य वर्गवारीच्या दरापेक्षा कमी म्हणजे एकप्रकारे सवलतीचा आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे विरार, ता.वसई येथील जिल्हाधिकारी, ठाणे यांनी बिगरशेती परवानगी मंजूर केल्याबाबत

(८१) * ९०३३ श्री.अनंत गाडगीळ, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी मौजे विरार, ता.वसई येथील सर्व्हे नं.२१९/५ या मधील ३३७० चौ.मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीसाठी दिनांक २९ मे, २००६ रोजी वा त्यासुमारास क्र.महसूल/क-१/टे-९/एनएपी/एसआर-०३/२००६ अन्वये बिगरशेती परवानगी मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित जमीन शासनाने जमीन धारकाला नवीन शर्तीने दिलेली असल्याने बिगरशेती परवानगी मंजूर करण्यापूर्वी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडून अर्जदाराने विक्री परवानगी आणलेली नसताना, तसेच नजराण्याची रक्कम शासनाकडे भरली नसतानाही, सदर बिगरशेती परवानगी मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे नजराण्याच्या आणि दंडाच्या एकूण ५० लाख रुपयांच्या अनर्जित रकमेस शासनाला मुकावे लागले, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून बिगरशेती परवानगी मंजूर करण्यात आल्याने शासनाच्या झालेल्या ५० लाख रुपयांच्या नुकसानीची वसूली करण्यासाठी बिगरशेती परवानगी रद्द करून परवानगी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) मौजे विरार, ता.वसई जि.पालघर येथील स.नं. २१९/५ क्षेत्र ३३७०.०० चौ.मी. ही जमीन पाटील इनाम ची असून जमिनीचे सहापट कब्जेहक्काची रक्कम शासनाला भरणा केल्याने नवीन शर्तीवर पुनर्प्रदान (रिग्रांट) करण्यात आलेली आहे. शासन परिपत्रक दि. ९/७/२००२ नुसार तहसिलदार वसई यांनी दि. ५/५/२००६ रोजीचे आदेशानुसार ६४६.८९ चौ.मी. इतक्या क्षेत्रासाठी जमीन वर्ग-१ केली असून यानुसार अनुज्ञाग्राही यांनी ६४६.८९ चौ.मी.जमिनीच्या मुल्यांकनाच्या ५०% रक्कम रु.३,०७,२७२.५०/- शासनजमा केली आहे. तदनंतर जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि. २९/५/२००६ च्या आदेशान्वये एकुण ३३७० चौ.मी. क्षेत्रास रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी दिलेली आहे. एकुण क्षेत्र ३३७० चौ.मी. पैकी ६४६.८९ चौ.मी. क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राचे अनुषंगाने मुल्यांकनाच्या ५०% रक्कम बिगरशेती परवानगी देताना वसूल करणे आवश्यक होते. या प्रकरणी नियमानुसार नजराणा रक्कम वसुल करण्याबाबत तसेच याबाबत संबधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी पालघर यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

राजूरा (जि.चंद्रपूर) शहरातील शासकिय भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

(८२) * **९७६४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) शहरातील सर्व्हे क्र. १४९ मध्ये शासकिय भूखंडावर अतिक्रमण झाल्याची बाब दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकिय भुंखडावर अतिक्रमण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) व (२) मौजे राजूरा येथील शासकीस भूखंड सर्व्हे क्र. १४९ मधील काही क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यापैकी ४२ व्यक्तींची अतिक्रमणे काढण्याबाबत तहसिलदार राजुरा यांनी आदेश पारित केले असून, ८२ व्यक्तींवर नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विद्युत खांबावर दुरुस्तीचे काम करत असताना हातात असलेल्या आर्थिंग रॉडचा स्फोट होऊन एक कामगार ठार झाल्याबाबत

(८३) * ७१९० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्युत खांबावर दुरुस्तीचे काम करत असताना हातात असलेल्या आर्थिंग रॉडचा स्फोट होऊन एक कामगार ठार झाल्याची घटना खडपोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) एमआयडीसी परिसरात घडली असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय,

दिनांक १७.०४.२०१५ रोजी सदर कामगार महापारेषण कंपनीच्या टॉवर लोकेशन क्र.४३ वर बंद असलेल्या २२० के.व्ही.पेडांबे-तांबाटी वाहिनीला अर्थिंग करण्याकरिता चढत असताना, त्यांच्या हातातील अार्थिंग रॉड चालू स्थितीत असणा-या २२० के.व्ही. पेडांबे-महाड वाहिनीच्या संपर्कात आल्याने प्राणघातक विद्युत अपघात झाला.

(२) सदर घटनेसंबंधी पोलिस अधिकारी व विद्युत निरिक्षकांना कळविण्यात आले आहे. विद्युत निरिक्षकांचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे अर्ज मंजूर करण्याबाबत

(८४) * ८१५० श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांनी विदर्भ सघन सिंचन कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या दोन वर्षात किती लाभार्थ्यांनी ठिबक सिंचन संच या योजने अंतर्गत अर्ज दाखल केले आहेत,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना अर्ज प्राप्त क्रमवारीनुसार ठिबक सिंचन संच देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच अर्ज प्राप्त क्रमवारीनुसार देण्याबाबत संबंधितांना आदेश देणार आहात काय,

(४) असल्यास, खामगांव येथील ठिबक सिंचन संच प्रलंबित अर्जासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देणार आहात काय ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) विदर्भ सघन सिचंन विकास कार्यक्रमा अंतर्गत खामगांव (जि.बुलढाणा) येथून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षात सूक्ष्म सिंचन संचासाठी अनुक्रमे ३६० व ३०४६ लाभार्थ्यांची अर्ज दाखल केले आहेत.

(२) सन २०१२-१३ पासून सूक्ष्म सिंचन संचाचे प्रस्ताव ऑनलाईन स्विकारण्यात येत आहेत. ऑनलाईन स्विकारण्यात येत आहेत. ऑनलाईन प्राप्त झालेल्या पात्र प्रस्तावांना पूर्वमान्यता व शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविल्यानंतर अनुदानाचे वाटप क्रमवारीनुसार करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) खामगाव तालुक्यातील सन २०१२-१३ मधील सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. सन २०१३-१४ या वर्षातील ३०४६ प्रस्तावांपैकी रु. ५.३ कोटीचे ११०८ प्रस्ताव निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरीत रु. ८.३६६६ कोटीचे प्रस्ताव सन २०१५-१६ या वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीतून निकाली काढण्याचे प्रयोजित आहे.

महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांकरीता लागणारी
खाजगी जमीन खरेदी करण्याबाबत

(८५) * **९६०० डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांकरीता लागणारी खाजगी जमीन वाटाघाटी करुन थेट खरेदी करण्याबाबतचे आदेश राज्याच्या महसूल व वन विभागाने नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जारी केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नव्या आदेशानुसार ग्रामीण भागात रेडीरेकनरच्या दराच्या ५ पट तर शहरी भागात रेडीरेकनरच्या २.५ पट मोबदला दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जमीन खरेदीत मोबदल्याचे दर निश्चित करण्याकरीता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व प्रक्रियेसाठी सर्वसाधारण किती कालावधी अपेक्षित आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय, हे खरे आहे.

खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी करण्याबाबत लागणारा कालावधी हा शेतक-यांची संख्या, खरेदी करावयाच्या जमिनीचे क्षेत्रफळ, गावांची संख्या, कामाचे स्वरुप (उदा.पाझर तलाव, गाव तलाव, लघु/मध्यम/मोठा प्रकल्प इ.) बाबी विचारात घेता प्रकरणपरत्वे भिन्न राहील. तथापि, सदर सर्व प्रक्रियेसाठी सर्वसाधारणपणे किमान ३ महिने व कमान ६ महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याबाबत

(८६) * ७०२० श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.रायगड) तालुक्यात यांत्रिक शेतीच्या माध्यमातून श्रम व वेळेची बचत करण्यासाठी शासनाने शेतक-यांना ट्रॅक्टर, पॉवर टिलर अशी यंत्रे खरेदी करण्याकरिता अनुदान देण्याची योजना आखली असुन प्रत्यक्षात मात्र २०११ पासून अनेक लाभधारक शेतकरी या अनुदानापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील दहागांव, अल्याणी, शिरगांव, आपटे, नांदवळ, धसई, मोहिपाडा, खारिवली, नेवरे इत्यादी ११ शेतक-यांची शहापूर पंचायत समितीकडे कृषीयंत्र खरेदीसाठी रीतसर अर्ज करुन एम.आय.डी.सी. डहाणू यांच्याकडून ट्रॅक्टर व पावर टिलर खरेदी केले होते. मात्र सन २०१५ उजाडले तरी या शेतक-यांना शासनाने जाहीर केलेले पन्नास टक्के अनुदान न मिळाल्याने रकमेवरील व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने आवश्यक कार्यवाही केली वा करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे नाही.

सन २०११-१२ पासून सन २०१४-१५ पर्यत कृषी अभियांत्रिकीकरण योजनेअंतर्गत शहापूर तालुक्यातील २० लाभार्थ्यांना पॉवर टिलर्सचा लाभ देण्यात आला आहे.

सदर योजना उपलब्ध निधीच्या मर्यादेतच राबविणे क्रमप्राप्त असते. त्यामुळे जिल्ह्यांना दिलेल्या लक्षांकांव्यतिरिक्त औजारांची वाढीव खरेदी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना अनुदान देणे शक्य होत नाही.

(२) हे खर नाही.

सदर योजने अंतर्गत अनुदानाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी कृषी औजारे खरेदी करण्यापूर्वी पंचायत समितीची पूर्वसमंती घेणे आवश्यक असते.

सदर शेतकऱ्यांनी शहापूर पंचायत समितीकडे पूर्वसमंतीसाठी रीतसर अर्ज न करता परस्पर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई (शाखा-डहाणू) यांचेकडून पॉवर टिलर खरेदी केले असल्यामुळे, सदर शेतकऱ्यांना अनुदान अनुज्ञेय नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड आर.टी.ओ.कार्यालयाच्या इमारत बांधकामास होत असलेला विलंब

(८७) * ७४९६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा प्रस्ताव दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मान्यतेस्तव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे घोसापूरी, ता.बीड शिवारात इमारत बांधकामासाठी ३० एकर जमीन शासनाने खरेदी केली असून सुमारे ८ कोटी रुपये किंमतीच्या बांधकामाचा आराखडा मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याची अपुरी इमारत आणि वाहनधारकांची वाढती संख्या यामुळे वाहन धारकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर.टी.ओ. कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामाबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे तसेच सदरच्या इमारतीचे बांधकाम केव्हा सुरु होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१), (२) व (३) होय.

(४) सदर इमारत बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वडकी (ता.रोळगांव, जि.यवतमाळ) परिसरातील कृषी विभागामार्फत सिंचन साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान दिले नसल्याबाबत

(८८) * ७६२३ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडकी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी विभागामार्फत सिंचन साहित्य खरेदी केले परंतू शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान दिले जात नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानाच्या आशेने खरेदी केलेल्या सिंचन साहित्याची रक्कम परिसरातील शेतकऱ्यांना अजूनही मिळाली नाही, हेही खरे हे आहे काय,

(३) असल्यास, गेली वर्षभरापासून शेतक-यांना कृषी विभागाच्या कार्यालयात वारंवार फेऱ्या मारावे लागत असून कृषी साहित्य विक्री केंद्राचे संचालक या शेतकऱ्यांकडून रक्कम घेऊन मोकळे झाले मात्र शेतकऱ्यांना अनुदानासाठी चकरा माराव्या लागत आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनामार्फत शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम केव्हा देणार याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) यवतमाळ जिल्ह्यातील राळेगांव तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०१३-१४ पर्यंतची अनुदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे. सन २०१४-१५ या वर्षातील ७७० प्रस्तावांपैकी १७४ शेतकऱ्यांना रु.३०.८४ लाख एवढी अनुदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे. या वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीतून उर्वरीत ५९६ प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील सिहोरा-बपेरा परिसरातील सिंचन परियोजनेचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याबाबत

(८९) * ८२३९ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील सिहोरा-बपेरा परिसरातील शेतीला सिंचन करण्याकरिता सुमारे ११० कोटीची उपसा सिंचन परियोजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परियोजनेवर वीज विभागाचे ३७ हजार रुपयांचे बील थकीत असल्याने माहे मार्च, २०१५ पासून परियोजनेचा वीजपुरवठा खंडीत करण्यांत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परियोजनेवरची वीज बिल थकण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, त्यामुळे या परियोजनेचे भविष्य धोक्यात आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय.
(२) होय, सदर परियोजनेचा वीजपुरवठा दिनांक ०७.०३.२०१५ ते ०७.०५.२०१५ पर्यंत तात्पुता खंडीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पातूर महावतिरण कंपनीच्या अंतर्गत येत असलेल्या भंडारज परिसरातील गावांमध्ये होत असलेले भारनियमन बंद करण्याबाबत

(९०) * **७६५०** **प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर महावितरण कंपनीच्या अंतर्गत येत असलेल्या भंडारज परिसरातील गावांमध्ये भारनियमाच्या नावाखाली पहाटे ५ ते दुपारी ३.३० पर्यंत व सायंकाळी असे १४ तासाचे प्रचंड प्रमाणात भारनियमन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उन्हामुळे उकाडयाचा त्रास संबंधित गावांच्या नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विज वितरण कंपनीने भारनियमन बंद करावे अशी मागणी भंडारज परिसरातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) नाही. भंडारज या गावाकरिता ३३ के.व्ही. उपकेंद्र पातुर येथुन ११ के.व्ही. शिर्ला फीडरद्वारे वीजपुरवठा केला जातो. ११ के.व्ही. शिर्ला फीडर हे सिंगल फेजिंग फीडर असुन भारनियमन वेळापत्रकानुसार ११ के.व्ही.शिर्ला फीडर (Loss : ४७.८६%. DCL group: E) मध्ये असुन, भंडारज परिसरातील गावामध्ये कृषी पंप विलगीकरण वाहिन्यांवरील ५०% कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व उर्वरीत ५०% कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने देण्यात येत

आहे. तसेच सिंगल फेज विद्युत पुरवठा १० तास व ६ तास भारनियमन करण्यात येते. महावितरणाच्या अमरावती परिमंडळ अंतर्गत अकोला जिल्ह्यामधील पातुर उपविभागामध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे व महावितरणचे पत्र दिनांक १४.०१.२०१३ प्रमाणे भारनियमन करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

(४) सिंगल फेजींग फीडरचे भारनियमनाबाबत मुख्य कार्यालयाचे सुधारीत परिपत्रक दिनांक १९.०६.२०१४ नुसार सदर वाहिनीवरील केवळ घरगुती, वाणिज्यीक, औद्योगिक ग्राहकांची विचारात घेत येणा-या वितरण व वाणिज्यीक हानी (DCL) प्रमाणे A,B,C,D गटामध्ये मोडत असल्यास भारनियमन रद्द करण्यात येते. भारनियमन कमी करण्याकरीता अचूक वीज देयक आकारणी व वीज चोरी प्रतिबंध मोहिम प्रभावीपणे राबविणे व वसुली वाढविणे ह्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दापोली (जि.रत्नागिरी) एस.टी. आगारातून प्रवाशांना योग्य सेवा मिळत नसल्याबाबत

(९१) * **१००३३ श्री.विजय सावंत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) एस.टी. आगारातून प्रवाशांना योग्य सेवा मिळत नसून अधिकारी वर्ग बरेच वेळा जागेवर उपस्थित नसल्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगारात एकूण ८० एस.टी. बसेस असून त्यात बऱ्याच गाड्या नादुरुस्त असून ३ ते ४ वर्षे होऊनही भंगारातून काढण्यात आलेल्या नसल्याचे आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) तसेच दापोली एस.टी. आगारातून सुटणाऱ्या बऱ्याच गाड्या वेळेत सुटत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते : (१) व (२) हे खरे नाही.

दापोली आगारातील तांत्रिक पर्यवेक्षकीय कर्मचारी हे मे, २०१५ मध्ये नियमित उपस्थित होते.

दापोली आगारात ७१ नियंताकरीता ७१ गाड्या उपलब्ध असुन गेल्या तीन वर्षामध्ये दापोली आगारातील एकुण १४ जुन्या गाड्या नियमानुसार मुदत संपल्याने निर्लेखन करुन चालनातून काढून टाकण्यात आल्या आहेत.

(३) उन्हाळी गर्दीच्या हंगामात रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे आगारात बसेस उशीरा येत असल्याने त्याचा परिणाम येणा-या/जाणा-या नियतांवर झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **उत्तमसिंग चव्हाण**

मुंबई. **सचिव,**

महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.